शुक्रवार, १२ एप्रिल २०२४
⊙ किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - २२७
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) FRIDAY 12 APRIL 2024 adhunikkesari.com ●YEAR-03 ●ISSUE-227 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05

# 'यातून' विरोधकांची मानसिकता दिसून येते

## शाहू महाराजांवरील टीकेला पवारांचे उत्तर

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** उमेदवारीच्या संदर्भात कुणाशीही चर्चा केलेली नाही. कशाचीही अपेक्षा न करता काही लोक पक्षात येतात. ज्यांनी प्रवेश केला त्यांनी कशाचीही अपेक्षा ठेवलेली नाही. अनेक राजघराण्यामध्ये दत्तक ही गोष्ट नवी नाही. त्यांच्यावर भाष्य केले म्हणजे विरोधकांनी किती खालची पातळी गाठली ते पाहा. मूळ शाहू महाराजांचा सेवेचा गुण होता, तीच भूमिका शाहू महाराजांनी घेतली आहे. अशा व्यक्तीमत्वावर टीका केली जात आहे, यातून विरोधकांची मानसिकता दिसून येत आहे, असे शरद पवार म्हणाले.


भाजपचे शिरुर लोकसभा मतदारसंघात खेड आळंदीचे समन्वयक अतुल देशमुख यांनी गुरुवारी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांच्या उपस्थितीत शेकडो कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षांमध्ये पक्षप्रवेश केला आहे. यावेळी खा. डॉ. अमोल कोल्हे उपस्थित होते. पक्षप्रवेशादरम्यान प्रसारमाध्यमांशी बोलताना पवार म्हणाले की, विविध राजकीय संघटनेमध्ये अतिशय चांगलं काम करणारे सहकारी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये लोकांचे काम करण्यासाठी सहभागी होत आहेत. देशमुखांनी आज निर्णय घेतला. लोकांचे काम करण्याची भूमिका त्यांनी खेड तालुक्यात बजावली. परंतु, लोकांच्या समस्यात आणि भाजपच्या धोरणात फरक आहे. त्यामुळेच त्यांनी निर्णय घेतला. मी त्यांच्या निर्णयाचे स्वागत करतो असे शरद पवार साहेब म्हणाले. शरद पवार म्हणाले की, माढा येथील धैर्यशील मोहिते पाटील हे आज भेटण्यासाठी आले होते. येत्या १६ तारखेला धैर्यशील मोहिते पाटील आमच्या पक्षात प्रवेश करतील. जयंत पाटील यांच्या उपस्थितीत ते प्रवेश करतील असे पवार म्हणाले. पवार पुढे म्हणाले की, त्यांनी जे विधान केले त्यानंतर आजपर्यंत काय वस्तुस्थिती दिसते. मी भाजपाबरोबर जायला पाठिंबा दिला असे ते म्हणाले. पण भाजपामध्ये कुणी गेले का? तर अजिबात नाही, असेही शरद पवार म्हणाले.

अतुल देशमुख म्हणाले की, गेल्या १० वर्षात भाजपचे काम करत असताना पक्ष वाढवण्याचे काम केले. गेल्या काही वर्षात स्वाभिमानाला धक्का बसला. सर्व सामान्यांचे काम होत नसतील, स्वाभिमानाने राहायचे असेल तर एकच नाव समोर आले ते म्हणजे पवारांचे होते.

# चंद्रपूरच्या मिरल भुतडा यांना आधुनिक केसरीचा समाजसेवेतील 'आयडॉल महाराष्ट्र' पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज






**चंद्रपूर :** बेलगम युनिव्हर्सिटीमधून सिव्हिल इंजिनिअरिंगची पदवी घेत आपले शिक्षण पूर्ण करणारी मिरल नितीन भुतडा या तरुणीने एक वेगळी वाट निर्माण करत एकार्जुना (ता. वरोरा, जि. चंद्रपूर) येथे गोसेवेचे कार्य सुरू केलेले आहे. अपघात होऊन रस्त्यावर पडलेल्या एका गाईला आपल्या घरी घेऊन येत असताना तिच्यासोबत आलेली दुसरी गाय आणि इथून त्यांची सुरू झालेली गोसेवा आज तब्बल 175 गायीपर्यंत येऊन पोहोचलेली आहे. गोसेवा करत असतानाच देशी गाईच्या वंशावर अभ्यास करत देशी गोवंश वाढावेत या दृष्टीने प्रयत्न करणारी आणि या गोवंशापासून उत्तम दर्जाचे तूप तयार व्हावे यासाठी या सर्व गायींच्या खाण्यासाठी लागणाऱ्या चाऱ्यांवर संशोधन करत त्या दिशेने आपली वेगळी वाटचाल करणारी तरुणी म्हणून मिरल नितीन भुतडा यांचे कार्य निश्चितच कौतुकास्पद आणि गौरवास्पद आहे. त्यांच्या या कार्याची दखल दैनिक आधुनिक केसरीने घेतली असून आधुनिक केसरीद्वारे 1 मे रोजी संभाजीनगर येथे होणाऱ्या कार्यक्रमात त्यांना महाराष्ट्र आयडॉल पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

आधुनिक केसरीच्या टीमने महाराष्ट्र आयडॉल पुरस्काराची घोषणा केलेली होती. त्यासाठी वेगळी वाट चोखाळणाऱ्या नागरिकांचे प्रस्ताव मागवण्यात आले होते. यात मिरल नितीन भुतडा यांचाही प्रस्ताव प्राप्त झालेला होता. या प्रस्तावावर आधुनिक केसरीच्या निवड समितीने विचार करत त्यांच्या घनश्यामलीला गोसेवा विकास व अनुसंधान संस्थान, एकार्जुना येथे भेट देऊन या प्रकल्पाची पाहणी केली व मिरल भुतडा यांच्याकडून या कार्याची संपूर्ण महिती घेतली. कोट्यवधी रुपयांच्या पॅकेजचा विचार करून नोकरीच्या मागे न धावता चंद्रपूर जिल्ह्यातील ही तरुणी एक वेगळी वाट चोखाळून आजच्या महाराष्ट्रातील तरुणाईसमोर एक वेगळा आदर्श निर्माण करत आहे. त्यांचे हे कार्य निश्चितच इतरांसाठी प्रेरणादायी असून त्यांच्या या वेगळ्या वाटेबद्दलच आधुनिक केसरीने त्यांना समाजसेवेतील 'महाराष्ट्र आयडॉल' पुरस्कार घोषित केलेला आहे. लवकरच छत्रपती संभाजीनगर येथे होणाऱ्या सन्मान सोहळ्यात त्यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. या पुरस्काराबद्दल मिरल भुतडा यांचे समाजातील विविध स्तरांतून कौतुक होत आहे.



गुरुवारी सकाळी सोनईमधील इदगाह मैदानावर ईद -उल-फित्र साजरी करण्यात आली. मुस्लिम बांधवांच्या वतीने सामुदायिक नमाज अदा करण्यात आली. मुस्लिम धर्मीयांचे पवित्र स्थळ असलेल्या मक्का मदिना येथे बुधवारी ईद साजरी करण्यात आली होती.

# बच्छाव यांच्या उमेदवारीनंतर जिल्हाध्यक्षांचा राजीनामा

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** डॉ. शोभा बच्छाव यांना लोकसभेची उमेदवारी जाहीर होताच काँग्रेसचे धुळे जिल्हाध्यक्ष शामकांत सनेर यांनी पदाचा राजीनामा दिला आहे. सनेर यांनी पक्षाकडे उमेदवारी मागितली होती. धुळे जिल्ह्याबाहेर उमेदवारी देऊन पक्षाने मतदारसंघातील निष्ठावंत कार्यकर्त्यांवर अन्याय केला आहे. त्यामुळे आपले मन व्यथित झाले आहे, असे सनेर यांनी राजीनामा पत्रात म्हटले आहे. प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांना हे राजीनामापत्र पाठविण्यात आले आहे. लोकसभा मतदारसंघाच्या इतिहासात प्रथमच राष्ट्रीय पक्षाने महिलेला उमेदवारी दिली असल्याने काँग्रेसच्या डॉ. शोभा बच्छाव विरुद्ध भाजपचे डॉ. सुभाष भामरे यांच्यातील लढत उल्लेखनीय ठरण्याची चिन्हे आहेत. या मतदारसंघात ७२ वर्षात केवळ सहा महिलांनी उमेदवारी केली असून एकही महिला संसदेत पोहोचली नाही.

# खा.लोखंडे लोकसेवा करण्यात अपयशी : आ. काळेंचा घरचा आहेर

आधुनिक केसरी न्यूज

कोपरगाव : शिर्डी लोकसभा मतदार संघातील जनतेच्या अपेक्षा दहा वर्षात पूर्ण करण्यात खा.सदाशिव लोखंडे कमी पडले असल्याचा घरचा आहेर नुकताच राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आ.आशुतोष काळे यांनी दिला आहे. त्यामुळे शिर्डी मतदार संघात उलटसुलट चर्चेला उधाण झाले आहे.


शिर्डी लोकसभा मतदारसंघाची निवडूक जाहीर झाली असून इच्छुकांनी आपला प्रचार सुरु केला उमेदवारी भरण्यास दि.१८ एप्रिल पासून प्रारंभ होत आहे.त्यातील महायुतीचे उमेदवार सदाशिव लोखंडे यांच्या प्रचारार्थ कोपरगाव शहरातील कलश मंगल कार्यालयात नुकताच महायुतीच्या वतीने विजय संकल्प मेळावा आयोजित करण्यात आला होता.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आ.आशुतोष काळे हे होते.

सदर प्रसंगी राज्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे,शालेय शिक्षणमंत्री दिपक केसरकर,महानंदाचे माजी अध्यक्ष राजेश परजणे,माजी आ.भाऊसाहेब कांबळे,माजी नगराध्यक्ष विजय वहाडणे आदींसह महायुतीच्या घटक पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

सदर प्रसंगी आ.काळे पुढे म्हणाले की,"निवडणुका आल्या की,विकासाचे मुद्दे येतात.त्यामुळे खा.लोखंडे यांनी निवडून आल्यानंतर कोपरगाव मतदार संघाकडे लक्ष द्यावे.२०१४ ते २०२४ मध्ये जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यात तुम्ही कमी पडलात ते यापुढे होवू देवू नका.राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजित पवार यांनी केलेल्या सहकार्यामुळे व दिलेल्या निधीमुळे कोपरगाव मतदार संघाचा विकास झालेला आहे.शिर्डीचे खा.लोखंडे यांना मागील निवडणुकीत निवडून देण्यात कोपरगाव मतदार संघातील मतदारांचे मोठे योगदान राहिले असून हि परंपरा यावेळी देखील अबाधित राहणार असून त्यांना जास्तीत जास्त मताधिक्य मिळवून देणार असल्याचा विश्वास आ.काळे यांनी व्यक्त केला आहे. त्यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले की,"गोदावरी कालव्याच्या लाभक्षेत्रातील संकटे थांबता थांबत नाही.एका संकटाशी संघर्ष सुरु असतांनाच दुसरे संकट उभे राहत आहे.दुष्काळी परिस्थितीत समन्यायीचे भूत अगोदरच गोदावरी कालव्यांच्या मानगुटीवर बसलेले असून त्याचा परिणाम मिळणाऱ्या आवर्तनावर होत असल्यामुळे लाभक्षेत्रावर



मोठा अन्याय झाला आहे त्याबाबत प्रत्येक अधिवेशनात आपण आवाज उठविला आहे. सरकार कोणतेही असो सातत्याने नगर-नाशिकच्या शेतकऱ्यांवर अन्याय होत असून त्याबाबत बैठका घ्याव्यात व अन्याय दूर करून दिलासा द्यावा.नांदूर मध्यमेश्वर बंधाऱ्यावर १० वक्राकार दरवाजे बसविले जाणार असल्यामुळे गोदावरी कालव्यांना ओव्हर फ्लोच्या पाण्यापासून मुकावे लागू शकते यामध्ये देखील लक्ष घालण्याची मागणी त्यांनी पालकमंत्री विखे यांच्याकडे केली.गोदावरी कालव्याचे सिंचनाचे आवर्तन आटोपले असून धरणात जवळपास साडे तीन ते चार टीएमसी पाणी उपलब्ध आहे.त्यामुळे दिल्या जाणाऱ्या पिण्याच्या पाण्याबरोबर सिंचनासाठी देखील आवर्तन होवू शकते त्याबाबत पालकमंत्र्यांनी सहकार्य करावे. यावर्षी दुष्काळी परिस्थिती असल्यामुळे मतदार संघातील पूर्व भागातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी सुरु असलेल्या पालखेड कालव्याच्या आवर्तनातून पाणी द्यावे त्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना सूचना द्याव्यात अशी मागणी पालकमंत्री ना.विखे यांच्याकडे त्यांनी केली आहे.





## फिटे अंधाराचे जाळे

आधुनिक केसरी

तिची कहाणी मोठी रोचक आणि प्रेरणादायी आहे. या रोमहर्षक कहाणीपर्यंत मी योगायोगानेच पोहोचलो. त्याचे झाले असे की माझा ' सावळबाधा ' या नावाचा लेख सांगलीचे श्री भालचंद्र करमरकर यांना व्हाट्सअपवर वाचायला मिळाला. त्यांना तो आवडल्याने त्यांनी माझ्याशी संपर्क साधला. त्यांनी लेख आवडल्याचे सांगून माझी चौकशी केली. मी त्यांना सहज विचारले ' आपण काय करता ? ' ते म्हणाले, ' मी शिक्षक होतो. आता माझे वय ९४ वर्षे आहे. ' हे ऐकून मी उडालोच. वयाच्या ९४ व्या वर्षी व्हाट्सअपवर एखाद्याचा लेख वाचून त्याला प्रत्युत्तर देणे ही गोष्ट माझ्या दृष्टीने तरी आश्चर्यकारक आणि कौतुकास्पद आहे. मी या पितृतुल्य व्यक्तीला फोनवरूनच नमस्कार केला. त्यांच्याबद्दल अधिक जाणून घेण्याचे माझे कुतूहल शमले नव्हते. मग ते सांगू लागले की माझी पत्नी आता ८५ वर्षांची आहे. मग मी त्यांच्या मुलांबद्दल चौकशी केली. तसे ते म्हणाले, ' मला एक मुलगी आहे वल्लरी नावाची. ' थोडी अधिक चौकशी करताना मला कळले की वल्लरी ही चारचौघांसारखी सामान्य नाही. तिची विशेष काळजी घ्यावी लागते. ती मेंदूच्या पक्षाघाताची ( CEREBRAL PALSY ) लहानपणीच शिकार बनली. ती आयुष्यभर अशीच राहणार आहे हे कळूनही करमरकर कुटुंबीयांनी दुसरे मूल होऊ दिले नाही. त्या मुलीला तळहाताच्या फोडासारखे आयुष्यभर जपले. त्यांची तपश्चर्या अडीच तीन तपाहूनही अधिक काळ. जी वल्लरी काहीही करू शकत नव्हती, ती जिद्दीने बी ए झाली, एम ए संस्कृत प्रथमवर्गात उत्तीर्ण झाली. हे सगळं ऐकून मी थक्क झालो. त्यांनी वल्लरीबद्दल, तिची हुशारी, तिची स्मरणशक्ती, गाण्यांची आवड याबद्दल अशा काही गोष्टी सांगितल्या की ल्लरीबद्दलचे माझे कुतूहल आणखीनच वाढले. मी त्यांना म्हणालो, ' काका, मला वल्लरीबद्दल, तिच्या प्रगतीबद्दल, तुम्ही केलेल्या प्रयत्नांबद्दल अधिक जाणून घ्यायला आवडेल. ' तसे ते म्हणाले, ' अहो विश्वासराव, आपण मी लिहिलेले ' फिटे अंधाराचे जाळे ' हे पुस्तक वाचा.



## हितगुज



पुष्प ३७वे

**गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)**

### पुन्हा स्मरावे महात्मा

आत्मबळ बनलेली अहिंसा, सत्याने मिळालेला आवेश, निर्भयता, सहनशीलतेतून मिळालेली मनाची ऊर्जा, सत्याग्रहातून आलेली दृढता, करुणेला लाभलेली कार्यदिशा, स्वातंत्र्याचे अध्यात्म, श्रमाचे महत्त्व, अन्यायाच्या विरोधाची झुंजार शक्ती, इत्यादींची आजच्या समाजाला नितांत गरज आहे. कारण त्यातून स्वावलंबन व स्वयंपूर्णता शक्य होणार आहे. म्हणून पुन्हा संत गाडगे महाराज, तुकडोजी व महात्मा गांधींना स्वतः समजून, जाणून घेणे प्रत्येकासाठी आवश्यक आहे. पुन्हा स्मरावे महात्मा गांधी राष्ट्रपिता महात्मा गांधी, संत नरसी मेहतांचे भजन नित्य प्रार्थनेत म्हणत असत. ते लोकप्रिय भजन आहे - 'वैष्णव जन तो तेने कहिए, जे पीड पराई जाने रे।' या भजनांतून संत नरसी मेहतांनी वैष्णव व्यक्तित्वाचेच गुण विशद केले आहेत. दुसर्याचे दुःख जाणून त्याबद्दल कळवळा असणारा, त्याला मदत करणारा, उपकार करताना किंचित ही अभिमान न बाळगणारा, कोणाची कधीही निंदा न करणारा, सर्व लोकांमध्ये सन्मान प्राप्त असून सर्वांना आदर देणारा, वचन, मन, कर्माने दृढ, कपटरहित, समानता बाळगणारा, पर स्त्रीस माते समान मानणारा, सत्यप्रिय, सत्यवचनी, परधनाची किंचित ही इच्छा नसलेला, मोह-मायादि विकारांच्या प्रभावाने मुक्त, दृढ वैराग्य धारण केलेला, रामनामात रंगलेला, त्याच्या शरीरात सर्व तीर्थ सामावली आहेत असा पावन, अशा गुणधर्माचा 'वैष्णव' नरसी मेहतांनी वर्णिला आहे. अशा व्यक्तिमत्त्वाचे दर्शन देखील तारणारे असते. त्यांची संगती उच्च परिवर्तन घडवते असे सांगून नरसी मेहतांनी एका उच्च, चारित्र्य संपन्न,उदात्त व्यक्तिमत्त्वाचा आदर्श समाजासमोर उभा केला आहे. असा 'माणूस' महात्मा गांधींची महत्त्वाकांक्षा होती. त्यांनी दिलेली एकादश तत्त्वे, या गुणधर्मांची वेगळी नावे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

**संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक**
**संपर्क क्र. ९९२२४२००३४**



## आनंदी पहाट

### आनंदप्राप्ती हीच खरी मोठी संपत्ती

आधुनिक केसरी

अंतरात्म्याला शांती मिळणे अत्यंत जरुरीचे असते, कारण त्यातच खरा आनंद असतो. आपल्या दैनंदिन गरजा भागवताना आपण केवळ शरीराचाच विचार करत असतो. अन्न, वस्त्र, निवारा ह्या तीनही गरजा खरे तर आपल्या शरीरासाठी आवश्यक असतात. आपल्याला त्या व्यतिरिक्त अजून एका गोष्टीची गरज असते, ती म्हणजे शांतीची. आनंद प्राप्ती म्हणजेच खरी यशप्राप्ती असते; हे ज्या व्यक्तीला समजते, त्याच व्यक्तीला त्याच्या जीवनातील सार कशात आहे, हेही कळू शकते. आपल्या अंतर्मनाला, अंतरात्म्याला शांती मिळणे मानसिक स्वास्थ्यासाठी अत्यंत आवश्यक असते. आपल्या दैनंदिन गरजांची पूर्तता करण्याच्या धावपळीत आपण आपली मुलभूत गरजच विसरून जातो, त्याची जाणीवच आपल्याला होत नाही. आपल्या जीवनातील सार कशात आहे, हे आपण स्वतःच शोधून काढायचे असते. त्याच्यासाठी आपल्या अंतरात्म्याचा शोध घेण्याची, त्याला समजून घेण्याची, त्याचा यथायोग्य विचार करण्याची जरुरी असल्याची आपल्याला जाणीव असलीच पाहिजे. आपल्या मनात येत असलेल्या प्रत्येक विचाराचा परिणाम कमी अधिक प्रमाणांत आपल्या मानसिकतेवर होत असतो. नकारात्मक विचारांचा विपरीत परिणाम होत असतो, तर सकारात्मक विचार यशप्राप्तीसाठी उपयुक्त ठरतात. आपल्या प्रत्येक कृतीपूर्वी विचार होण्याची जरुरी असते. आनंदप्राप्तीसाठी सकारात्मक विचारांचा माध्यम म्हणून उपयोग करण्याची आपल्याला सतत जाणीव होणे आवश्यक असते. आनंदाची गोडी अवीट असते, त्यामुळे आनंदप्राप्तीचा कधीच वीट येत नाही. आनंदाची प्राप्ती करण्यासाठी सकारात्मक विचार, वर्तन, व्यवहाराची गरज असते. त्यायोगेच सकारात्मक वातावरणाची निर्मिती होऊ शकते. आनंदाची निर्मिती आपल्याच अंतरंगांत करावी लागत असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

### डोले पांडुरंग | काळजात का ||

आनंदाचा कंद | गावला आम्हासी ||
नाम ऋषिकेशी | येता मुखी ||१||
लागलेसे ध्यान | हरपले भान ||
विकार बंधन | दूर झाले ||२||
एकचित्त झालो | नाचलो वारीत ||
रंगलो रंगात | सावळ्याच्या ||३||
चंद्रभागे तीरी | वैष्णवांचा मेळा ||
भेटीचा उमाळा | अनावर ||४||
भक्तीची लेखणी | आळवी अभंग ||
डोले पांडुरंग | काळजात ||५||




प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

सम्मुन्नति सीमा चरम, योगी लें विश्राम ।
पुरुषारथ सब लीन है, दुर्लभ सद्गुरु नाम ।।८३।।(स्वर्वेद पंचम मण्डल षष्ठ अध्याय) ०५/०६/८३

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
योगी परम पुरुषार्थाद्वारे सद्गुरूंच्या नाम, शब्द सत्पुरुषाची प्राप्ती करून विश्राम करतो आणि त्याच्या पुरुषार्थाचा त्यावेळेस अंत होतो. हीच जीवनाच्या उन्नतीची चरम सीमा आहे. जीवनाचा परम पुरुषार्थ परम पुरुषाच्या प्राप्ती नंतर पूर्ण होतो.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## गुणरूपनिरूपण

आधुनिक केसरी

हा समास अभ्यासत असताना सतत जाणवत रहाते की हे जग अनेक जाणीव व नेणीवाने भरलेले आहे. जीवन जगत असताना आपल्या सोबत असलेले पंचमहाभूते ह्यांचा विचार सतत करत रहावा .कारण आपल्या भोवती या पंचमहाभूतांचे आवरण सतत असते आणि म्हणून त्याला स्मरून सतत जीवन जगावे. मित्रांनो आता हेच बघा ना!

आपल्याला माहित आहे की पाणी हे जीवन आहे . आपल्या आजूबाजूला जर नजर टाकली तर समजेल की काही ठिकाणी तर फेब्रुवारी पासून पाणी टंचाई जाणवत आहे. म्हणजे पाणी आहे तेव्हा आहे आणि जेव्हा पाण्याचे सर्व स्रोत आटतात तेव्हा माणसाला पाण्यासाठी किती वणवण करावी लागते. त्यावर मागच्याचं आठवड्यात एक स्वतंत्र लेख लिहिला आहे. तो आवर्जून वाचावा.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## नामाचे त्रिकालाबाधित श्रेष्ठत्व!

आधुनिक केसरी

नाम हे सच्चिदानंद-स्वरूप आहे. शुद्ध परमात्मस्वरूपाच्या अगदी अगदी जवळ कुणी असेल तर ते फक्त नामच होय. नाम हे चिन्मय असल्यामुळे त्याचा आनंद ओसंडून येतो आणि ही सृष्टी तयार होते. अनेक रूपे घडविणे, ती मोडणे आणि नवीन तयार करणे, पण आपण स्वतः मात्र मूळ स्वरूपाने राहणे, ही केवढी विलक्षण लीला आहे ! खरोखर, तुम्हाला मी काय सांगू ! बोलायला शिकल्यापासून आजपर्यंत मी नामाबद्दलच बोलत आहे, अजून नामाचे माहात्म्य संपत नाही. नामाचे माहात्म्य सांगून संपले तर भगवंताचे भगवंतपण लटके झाले असे समजावे. जो नामात 'मी'पणाने नाहीसा झाला त्यालाच नामाच्या माहात्म्याची कल्पना आली. असा पुरुष नामाविषयी मौन तरी धरील, कारण त्याचे माहात्म्य कोणालाच सांगता येणार नाही; किंवा शेवटच्या श्वासापर्यंत नामाचे माहात्म्यच सांगत राहील, कारण ते कितीही सांगितले तरी संपणार नाही, आणि कितीही ऐकले तरी तृप्ती होणार नाही. नामाने सर्व पापे नाहीशी होतात. भगवंताला विसरणे हे सर्वांत मोठे पाप आहे. नामाने भगवंताचे



स्मरण होते. नाम हे वेदांपेक्षाही श्रेष्ठ आहे. कसे ते पहा. वेदाध्ययनापासून फायदा होण्यासाठी चारी वेदांचा अभ्यास करणे जरूर आहे. त्यासाठी पुष्कळ वेळ आणि श्रम लागतात. नामाला श्रम नाहीत. दुसरे, वेदांचा अधिकार सर्व लोकांना नाही, पण नाम कुणीही घ्यावे. वेदांच्या मंत्रांचा आरंभ ॐकारानेच होतो, म्हणून वेदारंभी देखील नामच आहे. नाम हे तीर्थयात्रेपेक्षा श्रेष्ठ आहे. अंतरंगामध्ये बदल होण्यासाठी यात्रा करायची असते; पण त्याला श्रम, पैसा, प्रकृती वगैरे गोष्टी अनुकूल असाव्या लागतात. नाम हे घरबसल्या अंतरंग बदलण्याचा अनुभव आणून देते. पंढरपूरला जाऊन नाम घेण्याचे जर न शिकला तर जाणे व्यर्थ गेले म्हणावे. नाम घ्यावे अशी बुद्धी होण्यासाठीच तिथे जाणे जरूर आहे. नाम हे सर्व सत्कर्मांचा राजा आहे. सत् म्हणजे भगवंत, त्याच्याकडे नेणारे जे कर्म तेच सत्कर्म. इतर कर्मे आडवळणाने भगवंताकडे नेतात, नाम हे साक्षात् भगवंताकडे पोहोचवते. नामाने भवरोग नाहीसा होतो. भव म्हणजे विषय. विषयांची आसक्ती असणे हा सर्व रोगांचा पाया आहे. नाम घेतल्याने भगवंताकडे प्रेम लागते आणि इतर ठिकाणची आसक्ती सुटते. नामाने सर्व दुःखे नाहीशी होतात, कारण या दुःखांचे मूळ विषयांच्या आसक्तीमध्ये आहे, आणि नामाने ती आपोआप सुटते, म्हणून दुःख नाहीसे होते. शिवाय, भगवंत हा आनंदरूप असल्याने त्याला नामाने घट्ट धरला की दुःख त्या ठिकाणी कसे राहू शकेल ? ४४. प्रत्येक मनुष्याने भगवंताचे नाम घ्यावे, त्याचे ध्यान करावे, त्याच्या स्मरणात राहावे, आणि आपल्या जन्माचे सार्थक करून घ्यावे.

## निरूपण

आधुनिक केसरी

**गौसायळ सामर ।या नांव आदिभूतिक ॥८॥**
**रानगाई रानम्हैसे ।रानशकट्ट आणी रीसें ।**
**रानहाती लांवपिसें ।या नांव आदिभूतिक ॥९॥**
**सुसरीनें वोढून नेलें ।कां तें आवचितें बुडालें ।**
**आथवा खळाळीं पडिलें ।या नांव आदिभूतिक ॥१०॥**
**नाना विखारें आजगर ।नाना मगरें जळचर ।**

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शुक्रवार, १२ एप्रिल २०२४
adhunikkesari.com

# तुम्हीही होऊ शकता...

# आयडॉल महाराष्ट्राचे!

## विश्वव्यापी मराठी दैनिक आधुनिक केसरी 'आयडॉल महाराष्ट्र'

**राज्यस्तरीय पुरस्कारासाठी प्रस्ताव मागवण्यात येत आहेत**

- आपण समर्पित भावनेने करत असलेल्या कार्याने देशाच्या उभारणीला हातभार लागत असेल...
- समाजात सकारात्मक बदल घडून येत असतील...
- आपले कार्य इतरांसाठी प्रेरणादायी असेल....

तर 'विश्वव्यापी मराठी दैनिक आधुनिक केसरी'च्या वतीने देण्यात येणाऱ्या 'आयडॉल महाराष्ट्र' या राज्यस्तरीय पुरस्कारासाठी आमच्याकडे 15 एप्रिल 2024 पर्यंत प्रस्ताव पाठवावे. आपली पुरस्कारासाठी निवड झाल्यास 1 मे 2024 रोजी महाराष्ट्र दिनी या पुरस्काराचे भव्य सोहळ्यात मान्यवरांच्या उपस्थितीत वितरण होईल.

**या ई-मेल आयडीवर प्रस्ताव पाठवावेत**



# एसबीआयचा नकार

आधुनिक केसरी

भारतीय स्टेट बँकेने माहितीच्या अधिकारांतर्गत निवडणूक आयोगाला दिलेल्या निवडणूक रोख्यांचे तपशील जाहीर करण्यास नकार दिला आहे. ही माहिती निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असली तरीही बँकेने आरटीआयअंतर्गत देण्यास नकार दिला आहे. बँकेने म्हटले आहे की, ही खासगी माहिती आहे. निवडणूक रोख्यांच्या योजनेला सर्वोच्च न्यायालयाने असंवैधानिक आणि मनमानी कारभार असे संबोधत १५ फेब्रुवारी रोजी भारतीय स्टेट बँकेला आदेश दिले होते की, १२ एप्रिल २०१९ पासून आतापर्यंत बँकेकडून खरेदी केलेल्या आणि त्यानंतर बँकेद्वारे पक्षांनी वटवलेल्या निवडणूक रोख्यांचा तपशील निवडणूक आयोगाकडे सादर करावा आणि निवडणूक आयोगाने तो तपशील सार्वजनिक करावा. त्यानुसार एसबीआयने ही माहिती निवडणूक आयोगाला दिली आणि निवडणूक आयोगाने त्यांच्या अधिकृत संकेतस्थळावर ती माहिती जाहीर केली आहे. निवडणूक आयोगाकडे सादर केलेली माहिती आरटीआयअंतर्गत मागितल्यानंतर एसबीआयने ती देण्यास नकार दिला आहे. तसेच बँकेने म्हटले आहे की, ही माहिती तुम्ही निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर पाहू शकता. माहिती अधिकार कार्यकर्ते लोकेश बत्रा यांनी १३ मार्च रोजी एसबीआयकडे अर्ज करून डिजीटल स्वरुपात निवडणूक रोख्यांचा तपशील मागितला होता. हाच तपशील बँकेने निवडणूक आयोगाला आधीच दिला आहे. मात्र हा तपशील माहितीच्या अधिकारांतर्गत देण्यास नकार दिला आहे. बँकेने माहिती अधिकार कायद्यांतर्गत दिलेल्या सवलतींशी संबधित कलम ८ (१) (ई) आणि ८ (१) (जे) या दोन कलमांचा हवाल देत ही माहिती देण्यास नकार दिला आहे. एसबीआयच्या उपमहाव्यवस्थापकांनी याप्रकरणी दिलेल्या उत्तरात म्हटले आहे की, तुम्ही मागितलेल्या माहितीमध्ये खरेदीदार आणि राजकीय पक्षांचे तपशील समाविष्ट आहेत. त्यामुळे ही माहिती उघड केली जाऊ शकत नाही. कारण तो विश्वासार्हतेचा प्रश्न आहे. एसबीआयच्या उपमहाव्यवस्थापकांनी देखील कलम ८ (१) (ई) आणि ८ (१) (जे) या दोन कलमांचा हवाला दिला आहे. माहिती अधिकार कार्यकर्ते लोकेश बत्रा यांनी पीटीआयला सांगितले की, निवडणूक आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असलेली माहिती द्यायलाच एसबीआयने नकार दिला आहे. बत्रा यांनी याबाबत आश्चर्य व्यक्त केले.



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

# पन्नास वर्षांची अक्षर यात्रा

आधुनिक केसरी

**उतार वयात आपण जुने हिशेब चाळत बसतो. मागच्या काळात रमायला आवडते सत्तरी पार केलेल्या आमच्या सारख्यांना! सहज हिशेब करताना आठवले. आपली पहिली कादंबरी अंधारातल्या सावल्या १९७३ साली प्रसिध्द झाली. त्याला या वर्षी ५० वर्षे पूर्ण झाली! काळ असा चंद्र यानाच्या वेगाने धावतो. या निमित्ताने मागे वळून साहित्यिक प्रवासाची उजळणी करावीशी वाटली.**

तसे मी शाळेत असल्या पासून लिहायला लागलो. लेखन वाचनातून उगवते. शालेय जीवनात खूप वाचले. फडके, खांडेकर, स्वा. सावरकर पासून, श्री. ना. पेंडसे, दळवी, नवरे, पु.ल., अत्रे, गोखले, गाडगीळ, माडखोलकर असे सर्व काही.. सुरुवात कवितेपासून झाली असावी. ६६ साली नागपूरच्या एका मासिकात लेख प्रसिध्द झाला. पहिली कथा अनुराधा मासिकात ६८ साली प्रकाशित झाली.. मग तरुण भारत मध्ये लिहायला लागलो..मी इंजिनियरिंग च्या तिसऱ्या वर्षाला असताना उन्हाळ्या च्या सुटीत पहिली कादंबरी लिहिली. ती तशीच पडून होती.पुढे मेनका,माहेर, वसंत,राजस, वसुधा, सुदर्शन अशा विविध मासिकातून कथा प्रकाशित व्हायला लागल्या. एक दोन कथा ना पारितोषक मिळाली.तेव्हा कॉन्फिडन्स वाढला. पुढे एम टेक झाल्यावर पहिली नोकरी मुंबईला लागली. त्या काळात प्रचंड वाचन.. लेखन देखील वाढले.. तेव्हा पेटीत पडून असलेले कादंबरी चे हस्तलिखित बाहेर काढले.अन् हिम्मत करून पुण्याला बेहेरे (मेनका प्रकाशन) यांना दिले पाठवून..साभार परत ची वाट बघत राहिलो. पण आश्चर्य म्हणजे त्याचे स्विकृतीचे पत्र आले! माझा माझ्यावरच विश्वास बसेना. आधी मासिकातून अन् नंतर पुस्तक रूपाने कादंबरी प्रसिध्द होणार होती.. त्यांनी काही सूचना केल्या होत्या. त्यानुसार किरकोळ बदल करून, पुनर्लेखन करून हस्तलिखित पाठवले.मेनका चे वैशिष्ट्य हे की मासिकातून कादंबरी प्रसिध्द होताच रसिक वाचकाची प्त्रे यायला सुरवात. माझ्या साठी हा अनुभव सुखद होता..काही महिन्यातच पुस्तकाच्या प्रती कल्याण च्या पत्त्यावर मिळाल्या. मला स्वर्ग दोन बोटे उरल्या सारखे वाटले. या यशाच्या झुल्यावर झुलत असताना मला नवी कल्पना सुचली.आय आय टी खरगपूर ला असताना मी माझ्या मित्र, मैत्रिणी ना नियमित पत्रे लिहीत असे.प्रथमच घर सोडल्याने आलेले एकटेपण विसरायचा तो एक प्रयत्न होता.या पत्राचे स्वरूप वेगळे होते.टी ख्याली खुशालीची पत्र नव्हती.विचाराच्या आदान प्रदाना तून स्वतःचे,अन् दुसऱ्याचे व्यक्तिमत्व घडविण्या चा तो एक प्रयोग होता.विज्ञान तंत्रज्ञान शिकताना नवनवीन प्रयोगा ची सवय झाली होती. लेखनात मी असे अनेक प्रयोग केले.पत्राच्या माध्यमातून लिहिलेल्या या कादंबरी चा जन्म कल्याणचा.आय आय टी ची पार्श्वभूमी असलेली मराठीतली एकमेव कादंबरी होती. शिवाय त्यात केवळ एकाच व्यक्तीची पत्रे होती. पत्रोत्तरे नव्हती. हाही नवा प्रयोग..हेही लिखाण मी बेहेरे यांनाच पाठवले..तेही त्यांनी ताबडतोब स्वीकारले.७४ साली आधी मासिकातून अन् नंतर पुस्तक रूपाने पत्रांजली कादंबरी प्रसिद्ध झाली.या कादंबरीला वाचकांनी,विशेष करून तरुणांनी अक्षरशः डोक्यावर घेतले.शेकडो पत्र आलीत. अजूनही या कादंबरी चे चाहते भेटतात..आता मी मेनका प्रकाशन चा लेखक झालो होतो..यानंतर एका पाठपाठ एक कादंबऱ्या प्रसिध्द केल्या. मेनका चा वाचक वर्ग प्रचंड आहे. दाद देणारा आहे.कमीत कमी शब्दात योग्य ती संपादकीय प्रतिक्रिया देऊन लेखकाला प्रोत्साहन देत हवे तसे लिहून घेण्याचे कसब बेहेरे यांच्यात होते.मी त्यांना भेटलो देखील नव्हतो. सगळा व्यवहार पोस्ट ऑफिस द्वारे!ज्या प्रकारचे लेखन मेनकात येत असे,त्या प्रकृतीचे माझे लेखन नव्हते. तरी मी बेहेरे यांच्या मर्जितला लेखक होतो हे विशेष! आता विविध दिवाळी अंकात देखील माझ्या कथा प्रकाशित व्हायला लागल्या. दरम्यान नागपूर हून एक कादंबरी, कथा संग्रह प्रसिध्द झाला. मेनका बरोबर दिलीपराज प्रकाशन, अनघा, मेहता, साकेत असे प्रकाशक स्नेह वर्तुळात आलेत. मधल्या काळात नागपूरहून एक कविता संग्रह देखील प्रसिध्द झाला.तिथले विदर्भ लेखक संघाचे मामा गंधे यांनी एकाच व्यासपीठावर एकाच वेळी १०० कविता संग्रह प्रसिध्द करण्याचा जागतिक रेकॉर्ड केला.त्यात माझ्या संग्रहाला सुरेश भट यांच्या हस्ते पुरस्कार देखील मिळाला.एरवी शासकीय किंवा इतर पुरस्कार मिळाल्याचे भाग्य माझ्या कुठल्याही पुस्तकाला लाभले नाही हेही तितकेच खरे.माझ्या कुठल्याही पुस्तकाचे समारंभात प्रकाशन झालेले नाही. वाचकाचा मात्र उत्तम प्रतिसाद लाभला.माझे घर, पोटपाणी लेखनावर अवलंबून नव्हते. आपले लेखन जास्तीत जास्त रसिक वाचकापर्यंत पोहचावे हा एकमेव उद्देश. तो मला मिळालेल्या प्रकाशकांनी पूर्ण केला याचे समाधान आहे. गेल्या काही वर्षात एकेक करून चांगली मासिके बंद झालीत. या साहित्यिक व्यवहारात,व्यापारात खोलवर जाण्याचे कारण नाही. पण लेखकांसाठी दरमहा चे व्यासपीठ बंद झाले हे खरे. त्यामुळे कथा लेखन दिवाळी अंकापुरते मर्यादित झाले. या बदलाला सामोरे जात मी वृत्त पत्रातले स्फुट लेखन वाढवले. आधीही लिहीत होतोच. पण गेल्या काही वर्षात सामाजिक, शैक्षणिक विषयावरचे लेखन वाढले.हा वाचक वर्ग वेगळा. त्यांची दाद देखील वेगळी.वृत्त पत्राची छाप, पोच सुध्दा वेगळी. मी कुठल्याही गटाशी संबंधित नसल्याने मटा, तरुण भारत, सकाळ, लोकसत्ता, लोकमत, सामना,देशोन्नती, पुण्य नगरी, पुढारी अशा सर्व प्रमुख पेपरात वेळोवेळी कमी अधिक प्रमाणात पण सातत्याने लिहिले. हे लिखाण महाराष्ट्रात काना कोपऱ्यात पोहोचले याचे समाधान आहे. दोन वेगळ्या प्रयोगा विषयी लिहिणे गरजेचे आहे. १९९० या कादंबरीची कल्पना मी बेहेरे यांना ८९ अखेरीस दिली. दरमहा मी एक प्रकरण लिहिणार.त्या महिन्यात घडलेल्या ताजा घटनाची पार्श्वभूमी त्यात असणार.एका कुटुंबाची कथा.. त्याची फक्त रूपरेखा कळवली. नेमके कथानक कसे फुलेल, माहिती नाही..कसे संपेल, माहिती नाही.. तरी बेहेरे यांनी ही कल्पना उचलून धरली. त्यात रिस्क असूनही स्वीकारली. एरवी हातात हस्त लिखित नसताना कादंबरी स्वीकारणे म्हणजे गंमत नव्हे.पण बेहेरे याचा माझ्या लेखनावर विश्वास होता. हा प्रयोग यशस्वी झाला. यातली काही प्रकरण तर मी परदेशातून पाठवली आहेत!..पुढे दहा वर्षानंतर हाच प्रयोग पुन्हा केला. त्याच कुटुंबाची दहा वर्षा नंतर ची कथा! हे लेखन ९९-२००० असे २४ महिने चालले! बेहेरे यांनी या प्रयोगाला महा कादंबरी असे नाव दिले! त्या काळात मेनका प्रकाशन बंद करण्याचे ठरत होते. आवरा सावर सुरू होती. पण माझ्या कादंबरीचे प्रपोजल आल्याने त्यांनी आपला निवृत्ती निर्णय पुढे ढकलल्याचे त्यांनीच मला सांगितले! बेहेरे यांनी प्रकाशित, संपादित केलेली माझी नव्या शतकाच्या उंबरठ्यावर ही शेवटची कादंबरी.त्यानंतर ते गेलेच.. माझ्या प्रत्येक संपादक, प्रकाशक यांच्या कडून मला काही न काही शिकता आले. अनुभव चांगले वाईट दोन्ही असले तरी ते मला समृद्ध करणारे होते. लेखनातून मिळालेले मानधन मोजण्याची मला कधीच गरज भासली नाही..माझे वास्तव्य महाराष्ट्राबाहेर असल्याने कुण्याच संपादक,प्रकाशकांची भेट, बोलचाल कधी झाली नाही. सगळे व्यवहार पोस्टाचे.. आपल्याकडे लेखक, प्रकाशक, संपादक यांच्यातील आर्थिक व्यवहार हे कधीच स्पष्ट नसतात.त्यात लॉजिक शोधण्यात अर्थ नसतो. सगळा एक तर्फी कारभार.प्रश्न आपले लेखन जास्तीत जास्त वाचका पर्यंत पोहोचावे हेच लेखकाचे उद्दिष्ट असते. त्यासाठी प्रकाशक ,संपादक हे एकमेव साधन असते. मला सुदैवाने (काही अपवाद सोडल्यास) चांगले संपादक,




प्रकाशक लाभले. त्यांची वितरण व्यवस्था छान होती. त्यामुळे महाराष्ट्र भर माझी पुस्तकं पोहोचली.. काना कोपऱ्यातून प्रतिसाद मिळाला.हेच माझे खरे मानधन मी समजतो. मी स्वतःला साहित्यिक वगैरे समजत नाही. मला कुठल्याही संमेलनाची निमंत्रणे येत नाहीत. लिहिताना संशोधन, अभ्यास, बैठक यात मी गुंतत नाही. जो लिहितो तो लेखक या व्याख्ये प्रमाण मी एक सामान्य लेखक आहे. तरीही माझ्या लेखनावर प्रेम करणारा, ते पुन्हा पुन्हा वाचणारा, आवडल्याचे आवर्जून कलाविणारा वाचक वर्ग मला लाभला आहे. हे मी माझे सद्भाग्य समजतो. काही दिवाळी अंकाचे संपादक सातत्याने आवर्जून माझे साहित्य दरवर्षी प्रसिध्द करतात याचा अभिमान वाटतो.

१२ कादंबऱ्या,१२ कथा संग्रह,८ लेख संग्रह,१ कविता संग्रह अशी एकूण ३३ पुस्तकं खाती जमा झालीत. दोन तीन येत्या काही महिन्यात प्रसिध्द होतील.) विविध मासिकातून, वृत्त पत्रातून प्रकाशित लेखाची संख्या ५५०, कविता १५३, कथा २६५ असा एकूण लेखन प्रपंच! मुळात इलेक्ट्रॉनिक इंजिनियरिंग चे संशोधन, अध्यापन, शिवाय आस्थापन अशा प्रोफेशनल जबाबदाऱ्या सांभाळून केलेले हे लेखन आहे.त्यामुळे ही तारेवरची कसरतच म्हणावी लागेल.तोल सांभाळला गेला हे नशीब! आता एकूणच पुस्तकं प्रकाशन क्षेत्रात मंदी आलीय.इथले व्यावहारिक,व्यावसायिक गणित पार बदललेले आहे.जुने जाणते प्रकाशक गेले. व्यवहार नव्या पिढीच्या हाती आले. त्यानेही फरक पडतोच. जोपर्यंत लेखक, प्रकाशक, संपादक यांचे सूर जुळतात नाहीत तोपर्यंत काही खरे नाही. याही क्षेत्रात व्यावसायिक कारणाने घटस्फोटाचे प्रमाण वाढले आहे, असे खेदाने म्हणावे लागते!



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

# कर्माच्या वारसाहक्काला कोणीही अपवाद ठरत नाही

आधुनिक केसरी

**अपवाद हि बाब कर्माला लागू पडत नाही म्हणून आपलं कर्म विचार पुर्वक असलं पाहिजे.आपण केलेल कर्म नियतीच्या वजाबाकी मध्ये टिकल पाहिजे.हाच कर्म सिद्धांत असतो. कर्म सिद्धांत समजला तर मग जीवन सुलभ होत.दैनंदिन जीवनात आपला कोणालाही शारीरीक मानसिक त्रास होणार नाही याची काळजी दक्षता घेतली गेली पाहिजे.कसही वागल तरी काहीच होत नाही हा फक्त गैरसमज असतो. तत्काळ हिशोब होत नाही पण योग्य वेळी नियती कोणालाही सोडत नाही.म्हणून आपलं कर्म विचार पुर्वक असलच पाहिजे.आयुष्य हे क्षणभंगुर आहे तर आत्मा अमर असुन शरीर नश्वर आहे.तरी सुद्धा आपण आपल्या चालत्या काळात अंधाधुंद वागतो पण जेव्हा नियती आपला हिशोब करते तेव्हा आपण बल असुन देखील निर्बल ठरतो.**

आयुष्यात निर्बल ठरायच नसेल तर निती धर्मा नुसार कर्म केल पाहिजे. आपल कर्म अनितीच असेल तर मग मात्र आपण कितीही बलवान धनवान असलो तरी एक वेळ नियती आपला हिशोब करतेच.हे आपण मान्य केले अथवा नाही केले तरी ते वास्तव आहे. आपली ताकद क्षमता, सत्ता संपत्ती, अधिकार पद याचा वापर निती धर्मा नुसारच केला पाहिजे. शक्ति ,सत्ता, संपत्ती, पद बळ याचा अंहकार बाळगु नये. अंहकार दुष्कर्म करण्यासाठी प्रवृत्त करतो.सत्कर्म करा सत्य निष्ठा आचरण केले तर वाईट वेळ येऊन सुद्धा वाईट होत नाही.नियती आपल्या मागे उभा राहते.सदैव नियती आपल्या मागे खंबीरपणे उभा राहील असंच कर्म केल पाहिजे.कर्म चुकलं तर मग मात्र नियती योग्य वेळी सोडत नाही.कर्म सुधारलं तर जीवन सावरत कर्म बिघडलं तर भविष्य उध्वस्त झालं म्हणून समजा हा निसर्गाचा अलिखित नियम आहे.धर्माच्या चौकटीत कर्म असेल तर नियती बरकत देते. धर्माच्या चौकटी मोडून कर्म केल तर योग्यवेळी नियती सोडत नाही.मग फक्त पश्चात्ताप शिल्लक उरतो.म्हणून आपलं कर्म सुधारता आलं पाहिजे कर्म सुधारलं तर जीवन आपोआप सुधारतं शक्ति सामर्थ्य ताकदी पेक्षा नियती वर जास्त विश्वास आणि विसंबून असलं पाहिजे.नियती समोर सामर्थ्य निरपयोगी ठरत. कोण शक्तिमान कोण बालवान हे महत्वाचं नसुन फक्त नितीमान टिकतो हे वास्तव आहे. क्षणिक आनंद हा आसुरी वृत्ती च लक्षण असतं. क्षणिक आनंद मिळण्यासाठी आपल्या बळाचा दुरुपयोग करण उचित नाही.आणि केलाच तर नियती योग्य वेळी सोडत नाही. आपल कर्म धर्माच्या चौकटीत असलं पाहिजे. निसर्ग प्रत्येक घटनेच बारीक चित्रीकरण करत असतो. योग्य वेळ आली कि निसर्गाने केलेला हिशोब भल्याच गणित बिघडवतो. आपली नियती हिच आपला बचाव करू शकते.वाईट कर्म केल्यावर काही होत नाही असं आपल्याला काही कालावधी साठी  वाटु शकतं तस वाटण  स्वाभाविक आहे.कारण नियती तात्काळ नाही तर योग्यवेळी हिशोब करत असते.कर्म करताना कोणीही साक्षीदार नसला तरी सुद्धा निसर्ग हा साक्षीदार असतोच. माणसं माफ करतीलही पण नियती कधीच कोणाला माफ करत नाही.जे पेरल ते उगवतच म्हणून शक्तिमान होण्या ऐवजी नितिमान व्हा नक्कीच कामी येईल. दैनंदिन जीवनात कर्म करत असताना विचार पुर्वक विवेक पुर्ण कर्म केल पाहिजे. आपल्याकडं किती ही बळ असलं शक्ती असली ताकद असली सर्व सृष्टी वरील शक्ति आपल्या बाजूने उभा राहिल्या व नियती फिरली तर आपल्या सोबतची कोणतीही शक्ति कामी येत नाही.अगदी बलाढ्य शक्ति सुद्धा नियती समोर निष्प्रभ ठरते.म्हणून आयुष्यात प्रत्येक कर्म करताना आपल्याला कोणी पाहिलं नाही तरी निसर्ग सगळं काही पाहत असतो.आपल्या शक्तिला वेळ प्रसंगी लोक घाबरु शकतात पण निसर्ग कोणालाही घाबरत नसतो.नियती योग्य वेळी भल्या भल्याचा हिशोब करते.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# दुष्काळ, पाणी, शेती, रोजगार आणि जगण्याच्या प्रश्नांवर नेते बोलणार का ?

## सत्तेचा सारिपाट जिंकण्यासाठी मश्गूल नेत्यांना मतदारांचा सवाल


आधुनिक केसरी

**राज्यात यंदा भीषण दुष्काळ,पाणीप्रश्न, शेतीची समस्या, रोजगाराची गंभीर स्थिती, आणि सामान्यांचे जगण्याचे अनेक प्रश्न सलाईनच्या बाटलीसारखे उलटे टांगले आहेत. सध्या लोकसभा निवडणूक रंगात आली आहे. दरवर्षीच हे प्रश्न सामान्य जनतेच्या नशिबी पाचवीला पुंजलेले आहेत. याला जबाबदार कोण? सत्तेचा सारीपाट जिंकण्यासाठी मश्गूल असलेले राजकीय मंडळी या गंभीर प्रश्नांवर बोलणार की नुसतीच मते मागणार असे प्रश्न सामान्य मतदारातून विचारले जात आहेत.**

आधुनिक केसरी जनचर्चा

### 'मेरा पॉवर मेरा व्होट है..' हे ठासून सांगण्याची वेळ

कदाचित देशात शेवटच्या लोकशाही पद्धतीने लढविल्या जाणाऱ्या निवडणुकीचा, अर्थात




लोकशाहीचा उत्सव साजरा करण्याचे हे दिवस. निवडणुकीच्या निमित्ताने तळागाळातील माणसांच्या, शेतकऱ्यांच्या सन्मानाचे त्यांच्या जगण्याचे, त्यांच्या रोजगाराचे नव्हेतर सध्याच्या महागाईचे अर्थशास्त्र सर्वच पक्षाच्या जाहीरनाम्यात येणे अपेक्षित होते. सध्या शेतीची स्थिती वाईट आहे. अकाली पावसामुळे पीक उध्वस्त होत आहेत. ही नैसर्गिक आपत्ती शेतकऱ्यांच्या पाचवीलाच पुजलेली आहे. दुष्काळ, अतिवृष्टी, गारपिटीत उदध्वस्त झालेला शेतकऱ्याचे पुढचे पाच वर्षे जगणे ताळ्यावर येत नाही. मात्र अशाही परिस्थितीत लोकसभेच्या या निवडणुकीत सामान्य जनतेने 'मेरा पॉवर मेरा व्होट है..' हे ठासून सांगण्याची वेळ आली आहे. सध्याच्या निवडणूकीतून पेट्रोल, डिझेलची दरवाढ, घरगुती गॅस, खाद्यतेलासह जीवनावश्यक वस्तूंची महागाई हे विषयच डिलिट झाले. नव्हेतर केंद्र सरकारने व राज्य सरकारने हे विषय निवडणुकीच्या अजेंड्यावर येऊ नये म्हणून जणू एकप्रकारे प्लॅनिंग केली. त्यानुसार राम मंदिराच्या उभारणीपासून तर धर्माच्या नावावर येणारे विषय दिसतात. तर दुसरीकडे 'ईडी' पासून तर 'सीबीआय'चा धाक दाखवून नवेतर प्रत्यक्ष अमंलबजावणीतून विरोधकांना उध्वस्त करण्याचा अजेंडा अर्थात एका राजकीय पक्षाचा हाच निवडणूक अजेंडा आहे. या अजेंड्यातून व्यवस्थेने स्वतःची व्यवस्था शाबूत ठेवण्याची सोय केली आहे. विरोधक पक्षाचे बॅक खाते गोठवण्यापासून तर त्यांनी कष्टकऱ्यांच्या हिताचे विषय अजेंड्यावर येऊ नये याचीही सोय केली आहे. तर काही विरोधकांना थेट ताकीद देऊनच घरी त्यांना स्वबळावर लढावं अशी सक्तीची सूचना केल्याचे या निवडणुकीत दिसत आहे. मात्र लोकशाहीच्या उत्सवातील प्रमुख पात्र असलेल्या मतदारांनी जागरुक राहून महागाईला कंटाळलेल्या सर्वसामान्य नागरिकांनी मेरा पॉवर मेरा व्होट या शस्त्राचा योग्य वापर करण्याची वेळ आली आहे. भीषण दुष्काळ, पाणीप्रश्न, शेतीची समस्या, रोजगाराची गंभीर स्थिती आणि सामान्यांचे जगण्याचे अनेक प्रश्न सलाईनच्या बाटलीसारखे उलटे टांगले आहेत. अशावेळी लोकसभा निवडणुकीतून सामान्य जनतेने सत्तेचा सारीपाटातील 'राजा' म्हणून आपली भूमिका निभवावी.

**– केवल जीवनतारे, नागपूर**
(सदस्य-डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने समिती महाराष्ट्र)

### जनतेने गोड आश्वासनांना बळी पडू नये...

सर्वसामान्य जनतेच्या भौतिक गरजांची दरवर्षी फरफट ठरलेलीच आहे. रा जकीय मंडळी केवळ गोड आश्वासने देऊन मोकळे होतात.निवडणूका



आल्या की मात्र गोंजारल्या जाते.ज नतेनी यामुळे भावनिक न होता अशांना योग्य धडा शिकवणे गरजेचे आहे. पंरतु मतदार चपटी आणि पैशाच्या मोहात गूरफटुन संकट ओढवू घेतात आणि पाच वर्ष सारेकाही निमूटपणे सहन करतात ही शोकांतिका आहे.मतदाराची नाडी पुढा-यांना गवसली असल्याने ते केवळ मतापुरते होला हो घालून खुर्ची मिळाली की केवळ हायहालो करून वेळ मारून नेतात. सध्या महागाई, भीषण पाणी टंचाई,सिंचनाचा प्रश्न,बेरोजगारीचा राक्षस धुमाकूळ घालतो आहे. याकडे कुणीच लक्ष देत नसल्याने जनतेची हेळसांड होत आहे. हे लोकशाहीत घातक ठरणारे आहे.


**बाबुराव पाटील, जेष्ठ पत्रकार, भोकर, जि.नांदेड**

### लोकशाही वाचवण्यासाठी मतदाराने जागृत व्हावे...



आज देशामध्ये अनेक जीवघेणे प्रश्न निर्माण केले आहेत. त्यामुळे बेरोजगारी, खाजगीकरण, महागाई, जातीयता, धर्मांधता, विषमता , आरक्षणावरून वाद, शेतकरी आत्महत्या, पाणी प्रश्न, भारतीय संविधानाची मोडतोड,वीज प्रश्न, भ्रष्टाचार हे नानाविध प्रश्न माणसांच्या जीवांशी रोजच्या व्यवहारात खेळत आहेत. या प्रश्नांचा सामना करता करता अनेक जण आपले जीवन संपून टाकत आहेत. याविषयी मात्र राजकीय सत्तेतील किंवा विरोधकही म्हणावे तेवढे बोलताना दिसत नाहीत. या लोकसभेच्या निवडणुका प्रचारात हे मुद्दे प्रतिनिधींना विचारात घ्यावेसे वाटत नाहीत. त्यावर कळकळून कुणीही भाष्य करताना दिसत नाही.त्यामुळे सामान्य माणूस प्रचंड हैराण आहे. शेतीला योग्य भाव मिळावा म्हणून शेतकरी आत्महत्या करतो आहे. त्याला वीज ही पुरेशी मिळत नाही. ग्रामीण भागातील सर्वसामान्य पाण्यासाठी वणवण करून मरत आहे. निगरगट्ट प्रतिनिधी मात्र त्याकडे दुर्लक्ष करत आहेत. देशातील जनता अन्न अन्न पाणी पाणी करून मरत आहे. तरीही लोकप्रतिनिधी मात्र यावर मुग गिळून गप्प आहे. सरकारच्या वेगवेगळ्या आडमुठ्या धोरणामुळे सर्वसामान्य माणसांच्या कल्याणाचे कंबरडे मोडले आहे. खाजगीकरणामुळे नोक-या संपविल्या आहेत. नवतरुणांना कुठलेही काम म्हणजे नोकरी नसल्यामुळे तो उद्ध्वस्त होत चालला आहे. शिक्षणाचे तीन तेरा वाजविले आहेत. तरी येणाऱ्या काळात कुठल्याही भूलथापांना बळी न पडता मतदारांनी योग्य प्रतिनिधींनाच निवडून द्यायला हवे. म्हणजेच लोकशाही जिवंत राहिली तरच आपले काहीतरी भवितव्य निर्माण होणार आहे. हे प्रत्येकाने लक्षात ठेवायला हवे.

**– प्रा. डॉ. सतीश मस्के**
पिंपळनेर (धुळे)



**संकलन : विशेष प्रतिनिधी**
**मांडणी सजावट : अतुल खंडगावकर**

### खोटारड्या लोकप्रतिनिधींचा मतपेटीतून उपचार झाला पाहिजे....



सत्तेसाठी आटापिटा करणाऱ्यांचे आणि आम माणसांचे, राष्ट्राचे प्रश्न वेगळे आहेत. खून करून वैकुंठाला गेले असा खोटा आभास निर्माण करणारे, गणपती दुध पितो छातीठोकपणे सांगणाऱ्यांना रयतेच्या प्रश्नांना बगल द्यायची आहे. सरडा रंग बदलतो त्यापेक्षा अधिक गतीने रंग बदलवून स्वतःचे संरक्षण करणारे जल, जंगल, जमीन, बेरोजगारी, देशाचे संरक्षण, महिलांचे संरक्षण, शेतकऱ्यांचे करूच शकणार नाही. म.फुले, डॉ. आंबेडकर यांचा विचार तोंडी लावणारे संविधान वेगळ्या दिशेने घेऊन जात आहे. जनतेने खोटारड्या, लाचार, भित्रे, स्वार्थी लोकप्रतिनिधी समजणाऱ्याचा मतपेटीतून उपचार केला पाहिजे. देश वाचविला पाहिजे. **– डॉ. हरीश धुरट,** कामगार चळवळीचे अभ्यासक, नागपूर


### यावेळच्या निवडणुका सुद्धा 'त्याला' अपवाद नसतील...



निवडणुकांचा काळ हा भाद्रपद महीन्यासारखा असतो. कोण कुठे काय बोलेल याला काहीच धरबंद नसतो. बहुसंख्य मतदार शेती निगडित व्यवसायात असल्याने शेतकऱ्यांना रुचेल आवडेल आणि भावेल असे बोलण्याकडे उमेदवार आणि प्रचारक यांचा कल असतो. निवडणूक काळात जे बोलले जाते ते निवडणूक संपल्यानंतर पाळायचेच नसते असा सर्वमान्य नियमच असल्याने बोलताना अजिबात कंजुषी केली जात नाही. पण शेती समोरील गंभीर मुद्द्यांवर निवडणूक काळात कधी चर्चा विचारविनिमय किंवा घोषणा होतात असे कधी जाणवत नाही. यावेळच्या निवडणुका सुद्धा त्याला अपवाद नसतील. **– गंगाधर मुटे, शेती प्रश्नांचे अभ्यासक**

### सवंग लोकप्रियतेला आळा बसला पाहिजे...

नेमेचि येतो मग पावसाळा या म्हणीप्रमाणे ठराविक कालावधीनंतर वेगवेगळ्या



निवडणुका येतातच. निवडणुका जाहीर झाल्या की, आश्वासनांची खैरात आणि प्रचाराचा धुरळा हे ठरलेलेच आहे. सामान्य जनतेच्या दृष्टीने जे प्रश्न महत्त्वाचे आहेत, त्यांचा उल्लेख करणे मी आवश्यक समजतो. महागाई, बेरोजगारी तसेच श्रीमंत - गरीब यांच्यामध्ये वाढत चाललेली दरी, शेतकऱ्यांच्या वाढत चाललेल्या आत्महत्या आणि सवंग लोकप्रियतेच्या आहारी जाऊन सारे काही मोफत देण्याची सत्ताधाऱ्यांकडून चाललेली स्पर्धा या गोष्टींना लगाम घालणे अत्यंत आवश्यक आहे. न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेली प्रकरणे निकाली काढण्यासाठी कालमर्यादा निश्चित करण्यात यावी. एक नागरिक म्हणून मतदान करणे हे आपले पवित्र कर्तव्य आहेच. पण त्याआधी मते मागायला येणाऱ्या उमेदवारांसमोर वर दिलेल्या समस्यांचा पाढा वाचून या समस्या सोडवण्यासाठी त्या उमेदवाराकडे काय योजना आहेत याची विचारणा करूनच कोणाला मतदान करायचे हे ठरवायला हवे, असे मला वाटते. **-उद्धव भयवाळ**



### आधी जाहीरनामा मगच नेत्यांना मतं दिली पाहिजेत...

स्वातंत्र्यानंतर देशाची अवस्था पाहता मूळ प्रश्नांना बगल देत फक्त



वरवरच्या मलंम पट्ट्या करून आपल्या झोळ्या भरण्यात तरबेज असणाऱ्या लांडग्यांना सामान्यांच्या व्यथा दिसणार तरी कधी. आजही खेड्यामध्ये पाण्याच्या टँकरवर अक्षरशः जत्रा भरते मारामारी होते डोके फुटतात टाहो फुटतो पण रोडवरच्या फुपुट्यात तसाच विरला जातो. भौगोलिक दृष्ट्या एवढा संपन्न असणारा प्रदेश आपल्या देशाचा पण राजकीय अनास्थे पोटी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेला नदी जोड प्रकल्प फक्त या देशाचा पाणी प्रश्न मिटवू शकेल.. पण यांना ते करायचे नाही. आणि पाणी आहे तर दुष्काळ मिटणार शेती फुलणार हातांना काम मिळणार हे सारं होणार पण या प्रश्नावर आपल्या नेत्यांनी गांभीर्याने विचार करणे गरजेचे आहे. काही होणार नाही अश्या आविर्भावात राहूच नये.मतदारांनी जागृत राहून या प्रश्नावर त्यांचा जाहीरनामा घेऊन मगच नेत्यांना मतं दिली पाहिजेत... **–डॉ. प्रवीण काळे, लेखक, माजलगाव जि. बीड**

### तुम्ही फक्त पावशेरी द्या...



तुम्ही फक्त पावशेरी द्या... नळंगिळं आटले, आटू द्या, पाण्यासाठी डोखेडाखे फुटले फुटू द्या आपल्याला काय त्याचं ? मी मत तुम्हालाच देतो,तुम्ही फक्त पावशेरी द्या,हे पाहा साहेब सरकार कोण्हाचीबी येवो, पाच वर्ष आम्हाला पिळणारच हाये, कुठंपण कशेपण छळणारच हाये, उद्या तुम्ही कूत्ताड्यावानी वर तगडीच कर्ता म्हून आज म्हंतो, मी मपलं मत तुम्हालाच देतो तुम्ही फक्त पावशेरी द्या......

**– किशोर भालेराव, प्रसिद्ध कवी, जालना**

# भाजपा, आरएसएसकडून संविधान संपवण्याची भाषा

## नाना पटोले : देशात मोदी सरकारच्या काळातच दलित, मागासवर्गीय, आदिवासींवर अत्याचार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना निवडणुका आल्या



की दलित, आदिवासी, ओबीसी, गरिब लोकांची आठवण येते. १० वर्षात या समाजासाठी मोदी सरकारने काहीही केलेले नाही. १० वर्षात या समाज घटकांवर अनन्वित अत्याचार केले गेले. ओबीसी समाजाचे राजकीय आरक्षण मोदी सरकारमुळेच गेले आहे. आदिवासींच्या जमिनी हिरावून घेऊन उद्योगपतींच्या घशात घातल्या, गरिबांना अधिक गरिब बनवले आणि लोकसभेच्या निवडणुका सुरु झाल्या की एससी, एसटी, आदिवासी समाजाची आठवण झाली का ? असा सवाल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी विचारला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रामटेक येथील प्रचार सभेत काँग्रेस व इंडिया आघाडीवर केलेल्या आरोपाला उत्तर देताना नाना पटोले म्हणाले की, १० वर्षात एससी, एसटी, आदिवासी समाजाचा विकास केला हा मोदींचा दावा खोटा आहे. उलट मोदी सरकारने मागासवर्गीय समाजासाठी असलेल्या कल्याणकारी योजनांच्या बजेटमध्ये कपात केली. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळत नाही. आदिवासी समाजाच्या महिलेला राष्ट्रपती केल्याचे सांगताना महामहिम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी संसदेच्या नव्या इमारतीच्या उद्‌घटनापासून वंचित ठेवले, अयोध्येतील राम मंदिर उद्‌घाटनाच्या सोहळ्यापासून वंचित ठेवून देशाच्या राष्ट्रपती, महिला व आदिवासी समाजाचा अपमान केला असताना कोणत्या तोंडाने नरेंद्र मोदी आदिवासींचा सन्मान केला असे सांगतात. गरिब समाजाला विकासाचा लाभ पोहचला असता तर ८० कोटी जनतेला ५ किलो मोफत रोशन द्यावे लागले नसते. ५ किलो मोफत धान्य देऊन १० वर्ष एससी, एसटी, आदिवासी व गरिब लोकांची मोदी सरकारने महागाई करुन प्रचंड लुट केली, या समाजाला जगणे कठीण करुन ठेवले आहे. नरेंद्र मोदींनी आज पुन्हा एकदा आपण गरिब समाजातून आल्यानेच विरोधक आपल्याला शिव्या देतात असे सांगून सहानुभुती मिळवण्याचा प्रयत्न केला परंतु २० लाख रुपयांचा सूट, ३ लाखांचा चष्मा, १.५ लाखांचा पेन आणि ८ हजार कोटींचे विमान वापरणारे नरेंद्र मोदी गरिब कसे? हा प्रश्न देशातील गरिब जनतेला पडला आहे, अशी गरिबी या समाजाला का लाभली नाही? ह्याचे उत्तर मोदींनी दिले पाहिजे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकारण काँग्रेसने संपवले हा नरेंद्र मोदी यांचा आरोपही खोटा व दिशाभूल करणारा आहे. भाजपाची मातृसंस्था आरएसएसला संविधान, देशाचा तिरंगा झेंडा पहिल्यापासूनच मान्य नाही. संविधान बदलण्याची भाषा संघ परिवार व भाजपाचे नेतेच सातत्याने करत असतात. लोकसभा निवडणुका सुरु होताच अनंतकुमार हेगडे या भाजपा नेत्याने ४०० पार चे बहुमत आले की डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान बदलणार हे जाहीरपणे सांगितले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आर्थिक सल्लागारानेही संविधान बदलले पाहिजे असे स्पष्ट केले आहे, असे असताना संविधानावरुन काँग्रेसवरच आरोप करणे हे पंतप्रधान मोदी व भाजपाला शोभत नाही, असा टोलाही नाना पटोले यांनी लगावला.

मागील १० वर्षातील मोदी सरकारचा कारभार हा शेतकरी, कामगार, महिला, तरुणवर्ग यांना उद्‌ध्वस्थ करणारा ठरला आहे. देशात ४० वर्षातील सर्वात मोठी बेरोजगारी आहे, मोदी सरकारने नोकर भरती केली नाही तरुणांच्या हाताला काम नाही, शेतकऱ्यांच्या पिकाला भाव नाही आणि १० वर्ष हा तर ट्रेलर आहे असे म्हणतात, पण हा ट्रेलरच जनतेला देशोधडीला लावणारा असेल तर जनता पुन्हा भाजपा व एनडीएला मते कशाला देईल. १० वर्षातील मोदी सरकारच्या पापाची शिक्षा जनता या लोकसभा निवडणुकीत देऊन त्यांना घरी बसवेल, असा विश्वासही नाना पटोले यांनी व्यक्त केला.

# 'मीटर'वर जोडाजोड केल्यास बसणार' झटका' : उपकारी अभियंता निरज बिदे'

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात घरगुती मीटरवर व्यावसायिक वापराचे प्रकार वाढल्याने महावितरणचा मोठा महसूल बुडत आहे. शिवाय बुधवारी नेमकं छावणीत झालेल्या आगीच्या दुर्घटनेत व्यावसायिक मीटर बंद करून घरगुती मीटरवर भार टाकल्याने शॉर्टसर्किटची घटना घडली. त्यामुळेच शहरातील विविध भागांतील व्यावसायिक आस्थापनांचे मीटर तपासण्याचे निर्देश सहव्यवस्थापकीय संचालक राहुल गुप्ता यांनी दिले असल्याची माहिती सोयगाव तालुक्याचे उपकार्यकारी अभियंता निरज बिदे यांनी सांगितले.

तालुक्यात व सावळदबारा परिसरात अशा विविध ठिकाणी घर आणि दुकाने, हॅाटेल्स किंवा अन्य व्यवसायांसाठी एकच मीटर वापरले जात आहेत. मुळात व्यावसायिक विजेचा दर घरगुती दरापेक्षा अधिक आहे. व्यावसायिक लोकही घरगुती मीटर वापरत असल्याने महावितरणचा महसूल बुडत आहे. त्यामुळेच सोयगाव शहरातील सर्वच दुकानदारांच्या मीटरची तपासणी केली जाणार आहे. ज्या लोकांचे समोर दुकान, हॅाटेल किंवा इत्तर व्यवसाय आहे आणि मागे घर आहे, अशा लोकांच्या मोटरवर अधिक लक्ष केंद्रित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या मोहिमेत जे व्यावसायिक घरगुती मीटरवरून वीजपुरवठा घेत आहेत, त्यांनी वापरलेल्या विजेचा हिशेब करून त्याची वसुली करण्यात येणार असल्याचे हि उपकार्यकारी अभियंता निरज बिदे' यांनी सांगितले आहे त्यानंतर ज्यांच्याकडे व्यावसायिक मीटर वसवलेले नाही, त्यांच्याकडे नवीन मीटर बसविण्यात येणार आहेत. सध्या महावितरणकडे नवीन मीटर उपलब्ध आहेत. त्यामुळे नवीन मीटर बसविण्याची कुठलीही अडचण नसल्याचे बिदे यांनी स्पष्ट केले.

**दुकान व घरासाठी घ्यावे लागणार स्वतंत्र कनेक्शन** : तालुक्यात महावितरणची थकबाकी दिवसेंदिवस वाढत आहे . ही वसुली करताना अधिकारी, कर्मचाऱ्यांची दमछाक होते . त्यामुळे महावितरण प्रीपेड मीटर बसविण्याकडे वाटचाल करत आहे . सध्या शहरासाठी प्रीपेड मीटर प्राप्त झाले आहेत . ज्या ठिकाणी फॉल्टी मीटर, संशयास्पद कमर्शियल मीटर आहे किंवा ज्या ठिकाणी मीटरच बसवलेले नाहीत, अशा ठिकाणी प्राधान्याने प्रीपेड मीटर बसविण्यात येणार आहेत लोकांना पारदर्शक आणि चांगली सेवा मिळाली पाहिजे, यासाठी महावितरणचा अधिक प्रयत्न आहे . त्यासाठीच लोकांमध्ये जाऊन प्रश्न समजून घेण्याचा प्रयत्न करत आहे . तक्रारी असलेल्या ठिकाणी आपण स्वत : भेटी देऊन पाहणी करत आहे . महावितरणच्या यंत्रणेतील त्रुटी दूर करण्याचा प्रयत्न सुरू आहे . **निरज बिदे, उपकार्यकारी, अभियंता सोयगाव .**

# नाशिकमध्ये पर्यायी कांदा बाजार सुरू

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** नाशिक जिल्ह्यात मागील १२ दिवसांपासून कांदा लिलाव बंद आहेत. या अडचणीवर मार्ग म्हणून बाजार समित्यांबाहेर, ग्रामपंचायतींच्या किंवा खासगी जागांत शेतकरी आणि व्यापाऱ्यांनी एकत्र येऊन पर्यायी बाजार सुरू केले आहेत. पण, दर कमी दर मिळत असल्यामुळे या बाजारातही शेतकऱ्यांचे प्रतिक्विंटल सरासरी ४०० रुपयांचे नुकसानच होत आहे.

हमाल, मापाडी आणि व्यापाऱ्यांच्या वादामुळे नाशिक जिल्ह्यातील १५ बाजार समित्यांमध्ये २९ मार्चपासून कांद्याचे लिलाव बंद आहेत. संपावर तोडगा निघत नसल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत होते. उन्हाळी कांदा घरात पडून राहत होता. या अडचणीवर मार्ग काढण्यासाठी शेतकरी आणि कांदा व्यापाऱ्यांनी एकत्र येऊन १० पर्यायी बाजार सुरू करण्यात आले आहेत. उमराणे (देवळा), सटाणा (सटाणा), विंचूर (लासलगाव उपबाजार), कळवण (कळवण), नांदूर-शिंगोटे (सिन्नर) आदी ठिकाणी पर्यायी बाजार सुरू करण्यात आले आहेत, अशी माहिती कांदाउत्पादक संघटनेचे अध्यक्ष भारत दिघोळे यांनी दिली.

# विविध सामाजिक संघटनांचा मुनगंटीवार यांना जाहीर पाठींबा

## मुनगंटीवार यांना निवडून देण्याचा केला संकल्प

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** लोकसभा निवडणूक जसजशी जवळ येत आहे



तसतशी वेगवेगळ्या क्षेत्रातील सामाजिक संघटना चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा मतदार संघातील भाजपा महाविकास आघाडीचे उमेदवार ना. सुधीर मुनगंटीवार यांना जाहीर पाठींबा देत आहेत. महिला पतंजलि योग समिती महाराष्ट्र, पालेवार भोई समाज चंद्रपूर, चंद्रपूर जिल्हा साऊन्ड सिस्टम असोशिएशन चंद्रपूर, राष्ट्रीय हिन्दू महासभा (भारत), राष्ट्रीय संघर्ष समिती ईपीएस ९५ चंद्रपूर जिल्हा, सोनार समाज चंद्रपूर जिल्हा,विश्वब्राम्हण पांचाळ सेवा समिती जिल्हा चंद्रपूर यांच्यासह अनेक सामाजिक संघटनांनी ना. सुधीर मुनगंटीवार यांना निवडून देण्याचा संकल्प हाती घेतला आहे. सुधीरभाऊंसारखा आपल्या हक्काचा उमेदवार निवडून यावा यासाठी अनेक संघटना सरसावल्या आहेत.

चंद्रपूर लोकसभा मतदार क्षेत्रात आता निवडणुकीचे जोरदार वारे वाहू लागले आहेत. हुकूमशाही विरुद्ध लोकशाही, माफियाराज विरुद्ध गुंडाराज असं चित्र यावेळी पाहायला मिळत असून सुधीर भाऊंची बाजू भक्कम दिसत आहे. ना. मुनगंटीवार चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री राहिलेत, मंत्री राहिलेत, त्यामधून त्यांनी केलेली अनेक विकासकामे ही त्यांची जमेची बाजू आहे. ते सलग निवडून येत आहेत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव मतदारसंघात आहे. विमानतळ, वेकोलीचे भूमिअधिग्रहण, प्रकल्पग्रस्तांच्या रोजगाराचा प्रश्न कळीचा सातत्याने ते लावू धरत आहेत. महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष चित्राताई वाघ यांच्या माध्यमातून सोनार व्यावसायिकांसाठी जाचक असणारी कलम ४११ रद्द करण्यात आली त्यामुळे आम्हाला फायदा होत आहे. त्यामुळे आम्ही सर्व सोनार समाज बांधव कार्यकारी अध्यक्ष प्रफुल चावरे, विदर्भ अध्यक्ष लक्ष्मीकांत लोळगे, जिल्हाध्यक्ष सुधाकर त्रिपुरवर, कोषाध्यक्ष सुमेध कसुळकर पाठींबा देत असल्याचे समर्थन पत्रात त्यांनी सांगितले आहे.

विश्वब्राम्हण पांचाळ सेवा समिती जिल्हा चंद्रपूर यांनी समाज बांधवानी सभा घेऊन ना. मुनगंटीवार यांना निवडून देण्याचा संकल्प हाती घेतला आहे. यावेळी सुधाकर श्रीपुरवार, रविंद्र मुकुलवार, गिरीश कंठीवार, सचिव बंडोपंत देवोजवार, दिलीप लिंगोजवर यांच्यासह अनेक सदस्यगण उपस्थित होते. राष्ट्रीय संघर्ष समिती ईपीएस ९५ चे चंद्रपूर जिल्हा अध्यक्ष परशुराम तुंडुलवार, पुरुषोत्तम राऊत, अरुण जमदाडे, दीपक जोगी, वसंत शिकारे कृष्णा बागुलकर आदींनी ना. मुनगंटीवार यांना जाहीर पाठींबा दिला आहे. राष्ट्रीय हिन्दू महासभा (भारत) चे प्रदेश अध्यक्ष शिवदास शर्मा यांनी समर्थनपत्र देऊन सुधीर भाऊंच्या विजयाचा संकल्प केला आहे. चंद्रपूर जिल्हा साऊन्ड सिस्टम असोशिएशन यांनी ना. सुधीर मुनगंटीवार यांची भेट घेऊन त्यांना जाहीर पाठींबा दिला आहे. यावेळी असोशिएशनचे अध्यक्ष उमेश लांडगे, देवाशिष गांगुली, अभिजित बेले, हर्षद साखरकर, एड मनीष शर्मा यांच्यासह अनेक सदस्य उपस्थित होते. पालेवार भोई समाज चंद्रपूर चे अध्यक्ष अभय बडकेलवार, सचिव राजेंद्र गर्गेनलावर, अजय कोतपल्लीवार, अरुण गर्गेनलावर, प्रदीप गर्गेनलावर यांच्यासह अनेक सदस्यांनी आम्ही ना. मुनगंटीवार यांच्या पाठीशी आहोत असा निर्धार केला. महिला पतंजलि योग समिती महाराष्ट्रच्या नसरीन शेख, स्मिता रेभनकर, वंदना भुशांवर, प्रतिभा रोकडे, स्मिता श्रीगडीवार, सविता मसराम, ज्योती कुंभार, मनीषा गौरकार आदींनी आम्ही सुधीर भाऊंना निवडून आणण्यासाठी पूर्णपणे प्रयत्न करू अशी ग्वाही देऊन समर्थन पत्र दिले आहे.

# महात्मा बसवेश्वर जयंती मंडळ अध्यक्षपदी मल्लिकार्जुन मटके, स्वागताध्यक्षपदी पांडुरंग शेटे

आधुनिक केसरी न्यूज

**मोहन पवार**

**लोहा :** प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी लोह्यात दि.१० में २०२४ रोजी होणाऱ्या महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या सार्वजनिक जयंती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून या पार्श्वभूमीवर नांदेड लातूर राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या श्रीनिवासा मंगल कार्यालयात आज शहर व तालुक्यातील सर्व बसव प्रेमी समाज बांधवांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत सर्वानुमते सामाजिक कार्यकर्ते मलिकार्जुन मटके यांची महात्मा बसवेश्वर सार्वजनिक जयंती मंडळाच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली तर स्वागताध्यक्षपदी पांडुरंग शेटे यांची निवड करण्यात आली जयंती मंडळाची नूतन कार्यकारिणी पुढील प्रमाणे -

उपाध्यक्ष- धीरज हाके,विठ्ठल आनेराव, संदीप कहाळेकर,सतीश शेट्टे,सचिव-बसवेश्वर डोम, सचिन बल्लोरे, कार्याध्यक्ष प्रणव वाले, नागनाथ विश्वासराव, गोविंदराव सोनवळे, सहसचिव-गजानन शेट्टे, शिवसांब बोंडारे, प्रमोद होळगे, विठ्ठल कामजळगे, धोंडीबा जाधव, प्रसिद्धीप्रमुख- शिवराज



पाटील पवार, साहेबराव सोनकांबळे, कैलास कहाळेकर ,सहकोषाध्यक्ष -सचिन खेडकर, ओम साखरे,गजानन चावरे, सदस्य- प्रसाद कहाळेकर, मारुती गोविंदपुरे, राजू पाटील, सुर्यकांत आनेराव, अरुण खेडकर, गजानन बेंद्रे, शिवराज आनेराव, गंगाधर सोनकांबळे, सल्लागार भालके दिगंबर उपस्थित होते. सदरील बैठक दत्ता शेटे, सतीश आनेराव, माजी नगरसेवक पंचशील कांबळे, स्वप्नील शेटे, दिगांबर भालके, सुभाष बनसोडे, अनिल होळगे यांच्या उपस्थितीत ही नूतन कार्यकारणी जाहीर करण्यात आली.

जगत ज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त लोह्यात शालेय विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, मॅरेथॉन स्पर्धा, महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर यास विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले असून जयंती महादेव मंदिर जुना लोहा येथून दुपारी साडेतीन वाजता निघणार असून समारोप रात्री दहा वाजता नगरपालीका लोहा बसवेश्वर महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यासमोर होणार आहे.

# आदिवासींचा नाथ काळाच्या पडद्याआड

## आदिवासी सेवक बद्रीनाथ कतारे यांचे निधन

आधुनिक केसरी

आयुष्याच्या कातरवेळेपर्यंत आदिवासी जमातींसाठी निरपेक्ष, निसंकोच, निगर्वी कार्म करणारे आदिवासींचे नाथ बद्रीनाथ कतारे यांचे दुःख निधन... अजिंठा डोंगर परिसराच्या कुशीत असणाऱ्या डोंगरदऱ्यातील दुर्लक्षित व दुर्बल भिल्ल, ठाकर आणि महादेव कोळी जमातीसाठी आपली उभी हयात खर्च करणारे, खरे आदिवासी मित्र, मा. बद्रीनाथ कतारे यांचे वयाच्या 75 व्या वर्षी काल दि. 9 एप्रिल, 2024 रोजी सकाळी साडेदहा वाजता अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. ही दुःखद बातमी समजली आणि त्यांचा संपूर्ण जीवनपट माझ्या डोळ्यासमोर उभा राहिला. बद्रीनाथजी कतारे 'काथार वाणी' समाजात जन्मले असले तरी त्यांचे सबंध जीवन, कार्य, आचरण आणि विचार आदिवासी जमातीसाठी समर्पित होते, त्यांचे मूळ गाव सोयगाव तालुक्यातील, नंतर ते रामपूरवाडी व कन्नड येथे स्थायिक झाले, वयाच्या सोळाव्या वर्षापासून त्यांनी समाजकार्याला व आदिवासी सेवेला प्रारंभ केला. राम मनोहर लोहिया यांनी स्थापन केलेल्या सोशालिस्ट समाजवादी विचार मंचशी ते मा. डॉ. टी. एस.पाटील साहेबांमुळे 1968 ला जोडल्या गेले. समाजवादी विचाराने भरवलेले, कन्नड तालुक्याचे लोकनायक, साहित्यिक तथा विचारवंत माजी आमदार स्मुतीशेष डॉ. टी. एस. पाटील साहेब यांच्या संपर्कात आले. त्यांच्या सोबत सावलीसारखे राहिले. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्वाला सखोल समाजवादी पैलू पडत गेले. मा. डॉ. टी. एस. पाटील साहेबांचे ते अत्यंत विश्वासू व निकटचे सहकारी होते, 1972 साली मा. बद्रीनाथजी कतारे आणि मा. टी. एस. पाटील साहेब या दोघांच्या नेतृत्वाखाली कन्नड तालुक्यातील भूमिहीन जमिनीसाठी मोठे आंदोलन उभा राहिले, तेव्हा 350 लोकांना अटक झाली, यामध्ये कतारे साहेब हे केवळ वीस वर्षाचे युवा आंदोलक होते. आदिवासी बांधवांच्या वन हक्कासाठी त्यांनी अनेक आंदोलने केली. खेड्यातील आदिवासीना पाणी मिळावे यासाठी 1975 ला त्यांनी सातकुंड धरणासाठी तीव्र आंदोलन केले. तत्कालीन मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांनी या लढ्याची नोंद घेऊन या धरणासाठी मंजुरी दिली. हे या आंदोलनाचे मोठे यश होते. महाराष्ट्र शासनाने या सर्व कार्याची दखल घेत, त्यांना 2003-04 मध्ये 'आदिवासी सेवक पुरस्कार' देऊन सन्मानित केले. तर माननीय डॉ. टी. एस. पाटील साहेबांनी त्यांना साने गुरुजी शिक्षण प्रसारक मंडळात संचालक म्हणून घेतले, पुढे त्यांचे चिरंजीव डॉ. मिलिंद पाटील यांनी त्यांच्याकडे संस्थेच्या उपाध्यक्षाची धुरा सोपवली. याबाबत कतारे भाऊंनी कधीही बडेजावपणा केला नाही की अंहकार बाळगला नाही.



डॉ. प्रकाश खेत्री,
संपर्क : ७८४३०९२२४४

विशेषतः 2006 पासून माझे आणि कतारे साहेबांचे मैत्रीपूर्ण संबंध होते, मी डॉ. भीमराव आंबेडकर कनिष्ठ महाविद्यालय, कन्नड येथे समाजशास्त्र विभागात 2004 साली रुजू झालो, आणि 2006 मध्ये पीएच.डी. संशोधनासाठी "विकास आणि परिवर्तनाच्या प्रक्रियेत अजिंठा डोंगर परिसरातील भिल्ल जमात ; एक समाजशास्त्रीय अभ्यास" हा विषय निवडला. विषय निवडल्यानंतर भिल्ल जमातीची प्राथमिक माहिती, वस्तीस्थाने, इतिहास, रूढी, प्रथा, परंपरा आणि संस्कृती संदर्भात माहिती मिळवण्यासाठी व चर्चा करण्यासाठी भाऊंच्या घरी वारंवार जात असे. ते निसंकोचण माहित देत, माहित असणाऱ्या गोष्टी अत्यंत स्पष्ट आणि मोजक्या शब्दात सांगात, कन्नड, सोयगाव, चाळीसगाव आणि सिल्लोड तालुक्यातील भिल्ल जमातीत काम करणारे कार्यकर्ते, संघटना आणि राजकीय नेते यांच्या विषयी प्राथमिक माहिती त्यांनी मला दिली होती. या विषयावर मी आठ वर्षे काम केले आणि 2014 मध्ये मला शिवाजी महाविद्यालय, कन्नड येथे समाजशास्त्र विभाग प्रमुख म्हणून कार्यरत असणाऱ्या परिवर्तनवादी कवयित्री, डॉ. प्रतिभा अहिरे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ . बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने पीएच. डी.बहाल केली. या सर्व कामात त्यांचे सहकार्य महत्वाचा होते, हे मी विसरू शकत नाही. त्यांच्यासोबत बोलताना त्यांच्यातील दुर्बल माणसाविषयी मातृ-हदयता स्पष्ट दिसून येत असे, प्रत्येक शब्दात आदिवासी विषयी कणव जाणवत असे. देशाला स्वातंत्र्य मिळून सात दशके झाले परंतु आजही आदिवासींच्या वाट्याला जे दुःख, दैन्य, दारिद्र्य, दुर्वस्था आलेली आहे. या विषयी ते व्यतीत होत. देशातील शासन व प्रशासन व्यवस्था



गेंड्याची कातडी सारखी आहे. असे ते म्हणत. आदिवासींच्या सुख-दुःखामध्ये ते समरस होत. शिक्षणाशिवाय आदिवासींचा उद्धार नाही, हा फुले-शाहू -आबेडकरांचा विचार ते वाड्या – वस्त्यावर रुजवत. आदिवासींनी आरोग्य विषयी जागरूक राहावे, जादूटोणा, जडीबुटीच्या नादी लागू नये, असे आवर्जून सांगत. ९ ऑगस्ट क्रांतीदिन ठाकरवाडी अंबाला ता. कन्नड तसेच चिवळी ता. खुलताबाद येथे दरवर्षी ठाकर बांधव, आदिवासी संशोधक डॉ. रमेश सूर्यवंशी सर यांच्या नेतृत्वाखाली 'क्रांती दिन' साजरा करतात, यामध्ये मा . बद्रीनाथजी कतारे आणि आम्ही सहभागी होत. तिथे आलेल्या शासन आणि प्रशासनातील प्रतिनिधींना आदिवासींचे दुःख ते प्रखडपणे मांडत, त्यांचे भाषणातील साधे, सरळ आणि प्रामाणिक शब्द ह्रदयाला भिडणारे असत. त्याच्या प्रत्येक प्रश्नामध्ये आदिवासीच्या उन्नतीची तळमळ जाणवत असे.

मा.कतारे भाऊ कन्नड तहसील मध्ये आदिवासींचे विविध प्रमाणपत्र काढून देत, ते रोजच तहसीलमध्ये कामे घेऊन येत, अनेक वेळा त्यांची तहसीलमध्ये भेट होत असे. तसेच पंचायत समिती, जिल्हा परिषद आणि आदिवासी विभागात आदिवासींच्या संदर्भात असणाऱ्या राज्य आणि केंद्र सरकारच्या विविध योजना ते आदिवासी पर्यंत पोहोचवत. बद्रीनाथजी कतारे यांच्यामुळे शेकडो आदिवासींना या योजनेचा फायदा झाला आहे. अनेकांना गॅस, घरकुल, निराधार आणि वृद्धांना पगार, शेतीसाठीच्या योजना आणि बेरोजगारांना मिळणारे भत्ते त्यांच्यामुळे प्राप्त झाले. कोणताही आढावेढा न घेता ते आदिवासी माणसाचं काम सहज करत असत. त्यांच्याकडून कोणतीही अपेक्षा न बाळगता निरपेक्ष आणि निस्वार्थ काम करत. त्यांची राहणी अत्यंत साधी होती. अंगावर खमीस, पायात पायझमा / पटलून, खांद्याला अडकवलेली शबनम बॅग आणि एक रुमाल, पायात साधी चप्पल वा बूट, चेहऱ्यावर दाढी वाढलेली, साधा मोबाईल असा साधा पेहराव होता. ना सायकल, ना गाडी, ते सातत्याने पायी चालत. ते मोजकेच पण महत्वाचं बोलत, अनेक वर्षांपासून त्यांना ह्रदयविकाराचा त्रास होता. तरी त्या आजाराला ते मोजत नव्हते. 22 नोव्हेंबर, 2021 रोजी आझादी का अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त, 'आदिवासी जन जाती गौरव सप्ताह सोहळा' आणि 'क्रांतीसुर्य वीर बिरसा मुंडा यांच्या जयंती' प्रसंगी आदिवासी विभाग महाराष्ट्र शासन यांच्यावतीने माझा आणि त्यांचा आदिवासी मुलांचे वस्तीगृह, कन्नड येथे आदिवासीसाठी करत असलेल्या कार्य व योगदानाबद्दल विशेष सत्कार करण्यात आला. त्यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना आपल्या आई-वडिलांची आठवण ठेवत अभ्यास केला पाहिजे, शासनाच्या विविध सुविधांचा व योजनांचा फायदा घेत आणि इतरांना सांगत आपण आपल्या समाजाची उन्नती केली पाहिजे, असे आवर्जून सांगितले. यावेळी गृहपाल श्री.आर.बी. पाडवी यांच्या परमेश्वर गुडेट्टींवार, श्री.डी. सी. मांडवे श्री. राठोड आदींची उपस्थिती होती.

मा. बद्रीनाथजी कतारे हे सोशालिस्ट समाजवादी विचार मंच, आदिम जाती सेवा मंडळ, राष्ट्र सेवा दल, सत्यशोधक कष्टकरी सभा, साने गुरुजी शिक्षण प्रसारक मंडळ आदी सामाजिक, शैक्षणिक व राजकीय संघटना व संस्थाची संबंध होते. त्यासाठी ते आपला वेळ देत. आदिवासी भिल्ल व ठाकरांना जातप्रमाणपत्र मिळावे, ते कसत वा वाहत असलेल्या वनजमिनी त्यांच्या नावावर करून देण्यात याव्यात, शासकीय योजना लाभार्थीपर्यंत पोहोचाव्यात यासाठी त्यांनी आपले आयुष्य वेचले, वेळ प्रसंगी लढे दिले. आदिवासींच्या न्याय हक्कासाठी ते तब्बल 21 वेळा तुरुंग गेले, स्वतः दुःख, दैन्य आणि दारिद्र्यात असूनही इतरांना त्यातून बाहेर काढण्यासाठी केलेले त्यांचे हे कार्य म्हणजे स्वतः उन्हात असूनही इतरांना सावली धरण्यासारखे आहे. म्हणूनचं मा. बद्रीनाथजी कतारे भाऊंचे हे एकूण योगदान आणि कार्य मला विशेष भावते. त्यांच्या जाण्याने नानासाहेब गोरे, एस.एम. जोशी व डॉ. टी. एस. पाटील यांच्या तालमीतील समर्पित कार्यकर्ता आणि खरा आदिवासी सेवक व मित्र हरवला आहे... त्यांच्या सामाजिक योगदान आणि आदिवासींच्या सेवेला माझा सलाम...

***स्मृतीशेष मा. बद्रीनाथजी कतारे भाऊंना भावपूर्ण श्रद्धांजली...***

# अजित पवारांचा भाजपला पाठिंबा देण्याचा प्रस्ताव शरद पवारांनी फेटाळला



आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख शरद पवार यांचा भाजपला पाठिंबा देण्याच्या भूमिकेबाबत ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल यांनी केलेल्या दाव्याला उत्तर देताना, शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते महेश तपासे यांनी अशा कोणत्याही प्रस्तावाला ठामपणे नकार दिला. पटेल यांचे विधान मतदारांमध्ये संभ्रम पेरण्याचा हेतुपुरस्सर केलेला प्रयत्न अशी टीका महेश तपासे यांनी केली. शरद पवार यांनी भाजपला पाठिंबा देण्याच्या कोणत्याही कल्पनेला तत्वतः आणि कृतीत ठामपणे नकार दिला. ही कृती शरद पवारांच्या राजकीय विचारांच्या अतूट बांधिलकीचा पुरावा आहे.

भाजपला पाठिंबा देण्याचा प्रस्ताव नाकारणे हे अजित पवार, प्रफुल्ल पटेल आणि इतरांसाठी निराशाचे कारण झाले. ही मंडळी आजही महाराष्ट्राच्या राजकारणात प्रासंगिकता राखण्यासाठी शरद पवार यांच्या नेतृत्वावर अवलंबून आहेत असा टोला महेश तपासे यांनी लगावला. तपासे पुढे म्हणाले अजित पवार गटाच्या नेत्यांच्या सर्व चौकशा आता बंद झाल्या असून अनेक प्रकरण थंड बस्त्यात पडले आहेत व हेच भाजपसोबत जुळवून घेण्याचे प्रमुख कारण होते. भाजपसोबत जाण्यात विकासाचा कुठलाच मुद्दा नव्हता. अजित पवार यांच्याकडे राष्ट्रवादीचे प्रतिनिधित्व करण्याचा नैतिक अधिकार नाही, कारण त्यांनी शरद पवार यांच्या पाठीत खंजीर खुपसून पक्षाचे नाव आणि चिन्ह मिळवले आहे. महाराष्ट्राची निष्ठा शरद पवार यांच्यावर आणि राज्याच्या भवितव्यासाठी त्यांच्या विचारांवर कायम आहे. महाराष्ट्र आगामी निवडणुकांच्या तयारीत असताना, लोकहितासाठी, समतेसाठी व इतर मूलभूत अधिकाऱ्यांसाठी आम्ही वचनबद्ध आहोत, असेही तपासे म्हणाले.

# कामामुळे तीन दिवस काही रेल्वे गाड्या रद्द

आधुनिक केसरी न्यूज

**मनमाड :** मनमाड ते भुसावळ या रेल्वेच्या अतिशय व्यस्त मार्गावर १४ ते १६ एप्रिल या कालावधीत चाळीसगाव येथे दुरुस्तीचे काम करण्यात येणार आहे. १५ एप्रिल रोजी डाऊन मार्गावर सकाळी सात ते साडेनऊ अडीच तास, अप मार्गावर दुपारी बारा ते अडीच असा अडीच तास तर दुसऱ्या दिवशी म्हणजे १६ तारखेला अप मार्गावर सकाळी सात ते दुपारी साडेबारा असे साडेपाच तास, याप्रमाणे काम होणार आहे. त्यामुळे रेल्वे प्रशासनाने नाशिक, मनमाड, भुसावळ दरम्यानच्या काही महत्वाच्या गाड्या रद्द केल्या आहेत.

# बाजार सावंगीत ईद उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी येथे व परिसरात ईद मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. येथे दि.११रोजी सकाळी चंदन ठिका, रेल रस्ता ईदगाहात ईद -ऊल-फित्रची नमाज अदा करण्यात आली. १०रोजी चंद्र दर्शन झाले.व ईदची तयारी सुरू झाली.रंगीबेरंगी नवीन कपडे, अत्तर सेंट व सकाळीच आठ वाजता ईदगाहात मुस्लिम बांधव पोहोचले. मौलाना लुकमान बुर्हानी यांनी यांनी ईद -ऊल -फित्रची नमाज पढावली तर तदनंतर खुदबाचे वाचन करुन दुआ केली.सावंगीसह दवाखाना कॉलनी, शिरोडी, शेखपूर येथील मुस्लिम नागरिक सहभागी झाले होते. पोलीस पाटील कारभारी नरवडे, दुरक्षेत्र पोलिस चौकीचे मुख्य जमादार विनोद बिघोत व त्यांचे सहकारी यांनी चोख बंदोबस्त ठेवला. तर परिसरात ठिकठिकाणी ईद मोठ्या उत्साहात तथा शांततेत संपन्न झाली.

# एक मत आपले भविष्य घडवू शकते : मुख्याध्यापक विठ्ठल राठोड

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे केंद्रीय जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या वतीने विद्यार्थ्यांनी रॅली काढून मतदान जनजागृती करण्यात आली. लोकसभा निवडणूक जनजागृती अभियानअंतर्गत सावळदबारा येथील जिल्हापरिषद केंद्रीय प्राथमिक शाळेच्या वतीने बुधवारी दि.१०/४/२४ रोजी मतदान जनजागृती रॅलीचे आयोजन मुख्याध्यापक विठ्ठल राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. शाळेच्या प्रांगणातून मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो या घोषणेच्या जयघोषात व ढोलताश्याच्या गजरात रॅलीला सुरुवात करण्यात आली. गावातील सहाही प्रभागातून रॅली काढण्यात आली. शाळेत पालक सभा घेऊन बीएलओ मार्फत नागरिकांना मतदानाचे महत्व पटवून देण्यात आले. निवडणूक साक्षरता मंडळाची स्थापना करण्यात आली. मतदान जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला या प्रसंगी मुख्याध्यापक विठ्ठल राठोड मार्गदर्शन करतांना लोकशाहीचा पाया मजबूत करण्यासाठी, योग्य व पसंतीचा लोक प्रतिनिधी आपल्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी आपल्याला ग्राम पंचायत ते लोकसभा ह्या लोकप्रतिनिधी गृहात आपले प्रतिनिधी पाठवणे आवश्यक आहे, व त्यासाठी मतदान करणे हे राष्ट्रीय कर्तव्य आहे एक मत तुमचे व तुमच्या परिसराचे भविष्य बदलू शकते, विद्यार्थ्यांनी आपले शेजारी, नातेवाईक, मित्र यांना मतदानाचे महत्त्व समजावून सांगावे.असे मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमात उपस्थितांनी व विद्यार्थ्यांनी लोकशाहीत बळकट करण्यासाठी मतदान करण्याची प्रतिज्ञा घेण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मदन मुठाळ यांनी केले., तर आभार प्रदर्शन भागवत गायकवाड यांनी केले या प्रसंगी सरपंच शिवगंगा शिवाआप्पा चोपडे, उपसरपंच मो आरिफ मो लुखमान, ग्रामपंचायत सदस्य मोहन सुरडकर, व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष जफर डी तडवी, मुख्याध्यापक विठ्ठल




राठोड, शिक्षकवृंद भागवत गायकवाड,मदन मुठाळ,आणिल चव्हाण, गजानन गवई, यांच्यासह शिक्षक, पालक, विद्यार्थी व नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# गारपिटीने बळीराजाचे कंबरडे मोडले

## हातातोंडाशी आलेला घासहिरावल्यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना अश्रू अनावर



आधुनिक केसरी न्यूज

**वसंत पाटील**

**वाशिम :** अवकाळी पावसाची व्याप्ती दिवसागणिक वाढतच चालली असून, पुढील काही दिवस वातावरण असेच राहणार असल्याचे बोलले जात आहे. नुकत्याच झालेल्या गारपिटीने बळीराजाचे कंबरडे मोडले आहे. परिणामी हाता तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतल्यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना अश्रू अनावर झाले आहेत. त्यामुळे नेहमीच आस्मानी संकटांचा सामना करणारे शेतकरी २०२३-२४ हे सर्वाधिक संकटाचे साल असल्याचे बोलत आहेत. यावर्षीच्या खरीप हंगामाची सुरुवातच शेतकऱ्यांसाठी खडतर झाली आहे. तेंव्हा पासून सुरु असलेली आस्मानी संकटांची मालिका अद्यापही सुरुच आहे. नऊ एप्रिलच्या सायंकाळी झालेल्या गारपिटीने तालुक्यातील पळसखेड,खडकी, करडा,धोडप, सवड आदी अनेक गावांना अक्षरशः झोडपून काढले आहे. परिणामी शेकडो हेक्टर क्षेत्रातील उन्हाळी मूग, भुईमूग, ज्वारी आदी पिकांसह फळबागा भुईसपाट झाल्या आहेत. तद्वतच यावर्षी अत्यल्प प्रमाणात लागलेल्या गावरान आंब्याच्या कच्च्या कैऱ्या गळून पडल्या आहेत. त्यामुळे यावर्षी गोरगरिबांना परवडणारे गावरान आंब्याचे लोणचे मिळणे सुद्धा दुरापास्त होणार आहे.

यंदाच्या सुरुवातीला झालेली अल्पवृष्टी, आगष्ट सप्टेंबर मधे पावसाने घेतलेली प्रदीर्घ विश्रांती आणि त्यानंतर रब्बी हंगामात अवकळी पावसाने घातलेले थैमान अशा अस्मानी संकटांचा सामना करता करता पहिलेच शेतकरी मेटाकुटीला आलेले आहेत. त्यातच बाजारपेठेत शेतमालाला मिळणारा कवडी मोल भाव या सुल्तानी संकटाने शेतकऱ्यांचे अवसान गळून पडले आहे. अशा बिकट परिस्थितीत सापडलेल्या शेतकऱ्यांनी पुढील हंगामात बी, भरणासाठी हातभार लागावा या आशेने उन्हाळी पिकांची पेरणी केली आहे. त्यासाठी मिळेल त्या पतपेढीतून, खाजगी सावकारांकडून कर्ज काढून उन्हाळी पिकांची पेरणी केली आहे. मात्र काल परवा झालेल्या गारपिटीने शेतकऱ्यांच्या आशेवर पाणी फेरले आहे. परिणामी शेतकऱ्यांवर कर्जमुक्त होण्याऐवजी कर्जबाजारी होण्याची वेळ आली असल्याचे नुकसानग्रस्त शेतकरी बोलत आहेत. गेल्या तीन चार वर्षापासून सलग मार्च, एप्रिल, आणि मे महिन्यात अवकाळी पावसाचा धिंगाणा घालने नित्यक्रमाने सुरुच आहे. मात्र त्याप्रमाणात गारपिटीचे प्रमाण नगण्य होते. परंतू यावर्षी निसर्गराजाने आपले चक्र उलटे फिरवले आहे. यंदा अवकाळी पावसाचे प्रमाण नगण्य आणि गारपीट तुफान झाली आहे. त्यामुळे बळीराजाचे कंबरडेच मोडून गेले आहे. अशा बिकट अवस्थेत शेतकऱ्यांना प्रशासनाकडून आधाराची कुबडी मिळणे नितांत गरजेचे आहे.









**काही ठिकाणी गारा नव्हे ; हिमकडाच कोसळला :** नऊ एप्रिलच्या सायंकाळी झालेली गारपीट एव्हढी भयान होती की, अक्षरश : रस्त्यावर गारांचा थर साचला होता .तर करडा, धोडप, खडकी आदी गावात पडलेल्या गारांची जाडी लिंबापेक्षाही ठोकर होती असे संबंधित गावातील लोक सांगतात . तर काही भागात गारांच्या ओझ्याने घरावरील टिन पत्रे वाकून मोडली असल्याची माहिती समोर येत आहे . तद्वतच या भयावह संकटात कुठलीही जीवीत हानी न झाल्यामुळे निसर्गराजाचे उपकार सुद्धा मानले जात आहेत . सदर बेतलेल्या संकटाचा अंदाज बांधला तर, गारा नव्हे ; हिमकडाच कोसळला असल्याचे संकटग्रस्त बोलत आहेत .

पारंपारिक पिकाला फाटा देत, मी यावर्षी दोन एकर क्षेत्रात बियाण्याचा कांदा लावला आहे .



गेल्या तीन, चार महिन्यांपासून रात्रंदिवस निगा राखत कांदा जोपासला आहे . भाव चांगला मिळत असल्याने किमान तीन ते चार लाख रुपयांचे उत्पन्न होण्याची अपेक्षा होती . पण गारपीट झाल्यामुळे संपुर्ण कांदा जमीनदोस्त झाला आहे . त्यामुळे उत्पन्न तर नाहीच, पण आता कर्जबाजारी झालो आहे . अशा बिकट परिस्थितीत शासनाकडून आर्थिक मदत मिळावी अशी अपेक्षा आहे . **शंकर सदार, (गारपीटग्रस्त शेतकरी, खडकी ( सदार ) ता .रिसोड )**

# उन्हात कामाशिवाय बाहेर फिरू नये

## डॉ. व्ही. पी. राजपूत यांचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**



**आष्टी :** तालुक्यात व धामणगाव परिसरात सध्या उष्णतेचा पारा चांगलाच वाढल्याचे दिसत आहे. परिसराचे तापमान जवळपास ३६ ते ३८ अंशावर पोचले असून उष्माघातामुळे अनेकांना तास होत आहे. उष्म्यामुळे काही ठिकाणी मुले अस्वस्थ होत असल्याच्या तक्रारी आहेत. वाढत्या उष्णतेचा धोका ओळखून आरोग्य विभागाचे वैद्यकीय अधिकारी डॉ व्ही पी राजपूत धामणगाव यांनी काळजी घेण्याचे आवाहन केले असून दुपारी उन्हात कामा शिवाय बाहेर न फिरण्याचे आवाहन केले आहे.
परिसरात उष्णतेथा पारा दिवसेंदिवस बाढतब चालला आहे. काही भागांमध्ये तापमानाने, ३९ अंशांचा आकडा पार केला असून, काही ठिकाणी परिसरात ३६ ते३८ अंशापर्यंत पोचले आहे. हवामान खात्याकडील नोंदीनुसार ग्रामीणमधील तापमानात दिवसेंदिवस वाढ होत चालली आहे. काही दिवसांपासुन तापमान ३९ अंशांवर पोचले होते. या वाढत्या उष्णतेचे गांभीर्य आरोग्य गांभीर्य ओळखून आरोग्य विभागाने नागरिकांना आवाहन केले की, सच्या कडक उन्हाळा असल्याने पाणी जास्त प्यायला पाहिजे, ताक, फळांचा रस जास्त प्रमाणात सेवन केल्यास त्याचा अधिक फायदा होतो. महत्तुताचे म्हणजे पाण्याचे प्रमाण जास्त असलेल्या भाज्या, फळांचे सेवन करायला पाहीजे. सैल हलक्या रंगाचे सुती कपडे या दिवसांत बापरायला पाहिजे. कडक उन्हात बाहेर जाताना सनग्लासेस, छती, टॉवेल परिधान करा. महत्तुताचे म्हणजे चहा, कॉफी, कार्बोनेटेड पेये वा अल्कोहोल या दिवसांत टाळायला पाहिजेत. उष्म्याचा तास होत असल्यास आरोग्य केंद्राशी तातडीने संपर्क साधावा, असे पण आव्हान डॉ व्ही पी राजपूत वैद्यकीय अधिकारी यांनी केले आहे.सध्या सगळीकडे तापमानात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. या काळात लोकांनी आपले आरोग्य सांभाळले पाहिजे. सरकारने काही आवश्यक मार्गसूची जारी केल्या आहेत. सर्वांनी त्याचे पालन करावे.
आष्टी आणि तालुक्यात उष्माघाताने रुग्रालये हाऊसफुद्ध असल्याचे सांगीतले जात आहे. त्यासाठी खबरदारी घेण्यासाठी आरोग्य विभागाकडुन काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सुजलाम सुफलाम असलेल्या या या तालुक्यात गेल्या काही वर्षापासून झाडांची बेसुमार कत्तल झाल्याने आष्टी तालुक्याची चाटचाल उष्ण परिसराकडे होताना दिसत आहे. धामणगाव परिसराच्या तापमानातही दरवर्षी बाढ होत आहे. यंदा तर कमाल तापमानाने उच्चांकच केला आहे. उन्हाच्या झळा असा होत असल्याने लोक दुपारच्यावेळी घराबाहेर पडण्याचे टाळत आहेत. उष्णतेमुळे आरोग्याच्या तक्रारी वाढत आहेत. त्यामुळे, आरोग्य विभागाने आवाहन केल्यानुसार सूचनांचे पालन करण्याची गरज आहे, असे पण वैद्यकीय अधिकारी डॉ व्ही पी राजपूत यांनी बोलताना सांगितले आहे.


गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in





# उष्णतेमुळे पंखे, कुलर खरेदीसाठी बाजारात गर्दी

## अडगळीतील कुलर दुरुस्तीसाठी बाहेर काढले : परिसरात दुकाने थाटली

आधुनिक केसरी न्यूज

**बि. डी. रामपूरकर**

**जिंतूर :** शहरासह परिसरात गेल्या काही दिवसापासून उन्हांची तीव्रता वाढली असून उष्णतेमुळे अंगाची लाई लाई होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. उष्णतेपासून शरीराला थंडावा मिळावा यासाठी कुलर, पंख्यांच्या मागणीत वाढ झाली असून जिंतूर परिसरात मोठ्या प्रमाणात कुलर , पंख्याची दुकाने थाटलेली दिसून येत आहेत. खरेदीसाठी इतर काहींची जुने कुलर ,पंखे दुरुस्तीसाठी झालेली लगबग पहावयास मिळते. होळी सणापासून उन्हाच्या तापमानात वाढ व्हायला सुरुवात झाली आहे. रोजचे तापमान 35 ते 36 सेल्सीयस पर्यंत राहत आहे दहा वाजेपासून कडक ऊन तापत आहे गेल्या तीन चार दिवसापासून तापमानात सातत्याने वाढवत असल्याने उकाड्यात पंखे देखील गरम हवा फेकत आहे त्यामुळे अनेकांची पावले कुलर खरेदी कडे वळू लागली आहेत. नागरिकांचे मागणी लक्षात घेता स्थानिक कुलर विक्रेत्यांनी रस्त्यांच्या कडेला कुलर, पंख्यांची दुकाने मोठ्या प्रमाणावर थाटलेली दिसून येतात.

**डेझर्ट कुलर खरेदीला ग्राहकांची पसंती :** अनेक ग्राहक डेझर्ट कुलर खरेदीला पसंती देत आहे हे कुलर खीडकीला बाहेरून लावून ठेवली की जास्त थंड हवा फेकतात तर त्यामुळे या कुलरला मागणी जास्त आहे . गतवर्षीच्या तुलनेत यावर्षी कुलरच्या दरातही वाढ झालेली आहे . दोन हजारापासून ते दहा हजार रुपयांपर्यंत कुलर उपलब्ध असल्याची येथील व्यापारी विक्रेत्यांनी सांगितले .

उन्हाच्या तापमानात दिवसें दिवस वाढ होत असल्याने खास नागरिकांच्या मागणीनुसार जास्तीचे कुलर विक्रीसाठी आणले आहेत . हे कुलर खरेदीसाठी दुकानांमध्ये सकाळी व सायंकाळी नागरिकांची गर्दी होत आहेत काही नागरिक ऑर्डर देऊन सुद्धा कुलर बनवन्यासाठी सांगत आहे तसेच कुलरच्या भुसालाही चांगलीच मागणी आहे . **विक्रेता**



# ग्रा.पं. सुलिभंजन येथे महात्मा फुले जयंती

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील सुलीभंजन येथे ग्रामपंचायत कार्यालयात क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.
राजेश थोरात पत्रकार यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. महात्मा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचा जयघोष करण्यात आले यावेळी वीरेंद्र वाघ, नितीन जाधव, विकास घाटे, राजेश निकाळजे, संदीप बागुल, योगेश मगरे, राहुल बनकर, नितीन मगरे, पवन निकाळजे, राहुल निकाळजे, सखाराम खरात, चंद्रकांत देवकर आदींची उपस्थिती होती.

# वीज कोसळून महिलेचा मृत्यू, तिघे गंभीर

## अवकाळीने दाणदाण; दोन दिवसांत ५०० घरांची पडझड

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** जिल्ह्यात मंगळवारी सायंकाळपासून अवकाळी वातवारण आहे. बहुतांश भागात मंगळवारी रात्री, बुधवारी पहाटे व सायंकाळी सोसाट्याच्या वाऱ्यासह अवकाळी पाऊस कोसळला. अनेक भागात वादळी पाऊस व गारपीटीमुळे दोन हजार हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले. आर्णी तालुक्यात वीज कोसळून महिलेचा मृत्यू झाला तर तीन जण जखमी झाले. यवतमाळ नजीक शेतात वीज कोसळल्याने बैलजोडी ठार झाली. आर्णी ते सावळी रोडवर असलेल्या वीटभट्टीवर काम करणाऱ्या मजूर महिलेचा वीज कोसळल्याने मृत्यू झाला. सिंधू सुभाष राठोड (४०, रा. अंतरगाव) असे मृत महिलेचे नाव आहे. या घटनेत धम्मपाल विष्णू भगत (४०), कल्पना धम्मपाल भगत (३५) आणि हर्षद धम्मपाल भगत (९) सर्व रा. डोळंबा हे तिघेजण गंभीर जखमी झाले. जखमींवर यवतमाळ येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उपचार सुरू आहेत. दरम्यान यवतमाळ नजीक बरबडा शिवारात वीज कोसळून प्यारेलाल पातालबंसी यांची बैलजोडी ठार झाली. अवकाळी पावसाने जिल्ह्यातील अडीचशेवर गावांतील दोन हजार हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले. केळापूर तालुक्यात सर्वाधिक ७८० हेक्टरवरील पिके उद्ध्वस्त झाली. आंबा,



टरबूज, खरबूज, गहू, तीळ, मका, भूइमुंग आदी पिकांसह भाजीपाला व फळबागांचे मोठे नुकसान झाले. बाभूळगाव शहरात वादळी पावसाने अनेक घरांवरील छप्पर उडाले. तर तालुक्यात ५४४ घरांची पडझड झाली. जिल्ह्यात आतपर्यंत ५८० घरांची पडझड झाल्याची प्राथमिक माहिती प्रशासनाकडे आली आहे. दोन दिवसांत जिल्ह्यात १५.९ मिमी पर्जन्यमानाची नोंद झाली. आज गुरूवारी सकाळपासूनच ढगाळी वातावरण असून सोसाट्याचे वारे वाहत आहे. त्यामुळे आज संध्याकाळीसुद्धा जिल्ह्यास वादळी पावसाचा तडाखा बसण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# सावळदबारा येथे शिवाजी विद्यालयाच्या वतीने रॅली काढून मतदान जनजागृती

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील जय कालिका देवी शिक्षण संस्था संचलित कै.लक्षम्यनराव भीमराव कोलते कला व विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय व छत्रपती शिवाजी माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांनी रॅली काढून मतदान जनजागृती करण्यात आली. लोकसभा निवडणूक जनजागृती अभियानअंतर्गत सावळदबारा येथील छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या वतीने बुधवारी दि.१०/४/२४ रोजी मतदान जनजागृती रॅलीचे आयोजन प्राचार्य नारायण कोलते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. शाळेच्या प्रांगणातून मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो या घोषणेच्या जयघोषात व ढोलताश्याच्या गजरात रॅलीला सुरुवात करण्यात आली.गावात प्रत्येक चौका चौकात विद्यार्थ्यांनी मतदान विषयी घोषणा भाजी केली गावातील सहाही प्रभागातून रॅली काढण्यात आली. शाळेत पालक सभा घेऊन बीएलओ मार्फत नागरिकांना मतदानाचे महत्व पटवून देण्यात आले. निवडणूक साक्षरता मंडळाची स्थापना करण्यात आली.
मतदान जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला या प्रसंगी प्राचार्य नारायण कोलते पाटील यांच्या नेमकेच काकूचे निधन झाले आहे तरी दुःख बाजूला सावरुन मतदान विषयी जनजागृती केले. प्राचार्य नारायण कोलते पाटील मार्गदर्शन करतांना लोकशाहीचा पाया मजबूत करण्यासाठी, योग्य व पसंतीचा लोक प्रतिनिधी आपल्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी आपल्याला ग्राम पंचायत ते लोकसभा ह्या लोकप्रतिनिधी गृहात आपले प्रतिनिधी पाठवणे आवश्यक आहे, व त्यासाठी मतदान करणे हे राष्ट्रीय कर्तव्य आहे एक मत तुमचे व तुमच्या परिसरा चे भविष्य बदलू
शकते, विद्यार्थ्यांनी आपले शेजारी, नातेवाईक, मित्र यांना मतदानाचे महत्त्व समजावून सांगावे. असे मार्गदर्शन करण्यात आले.या कार्यक्रमात उपस्थितांनी व विद्यार्थ्यांनी लोकशाहीत बळकट करण्यासाठी मतदान करण्याची प्रतिज्ञा घेण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा डॉ प्रवीण सरकटे यांनी केले., तर आभार प्रदर्शन प्रा.मदन डोखळे यांनी केले या प्रसंगी कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा जीवन कोलते पाटील यांनी परिश्रम घेतले आहेत. सर्व विद्यार्थी व गावातील पालक मान्यवर उपस्थित होते शाळेतील शिक्षकसर्व शिक्षक सर्व विद्यार्थी व शिक्षक विकास पाटील, विजयसिंग, प्रा. मदनभाऊ डोखळे, राजपूत, भास्कर ससाणे, संजय जोशी, भास्कर खमाट, मुकुंद व्यवहारे, सुदाम राठोड, ज्ञानेश्वर राठोड, पोपटराव सोनवणे, भूषण देसले,शाम जाधव, अजबराव चव्हाण, बाबासाहेब कोलते, राहुल बडक, गणेश मोहने, गणेश सत्रे, जयराम घोती, सतीश खवले, पंजाबराव शेळके, योगेश थोटे, सतीश गावंडे, जयराम घोती मनोहर पडोळ, संजय अमृतकर, शिवाजी सत्रे इत्यादी प्राध्यापक व शिक्षक उपस्थित होते तर सर्व विद्यार्थी व पालक व दैनिक माझा मराठवाडा मराठवाड्याचे विभागीय संपादक गोकुळसिंग राजपूत, रहीम पठाण, सुनील चोरमले, जब्बार एस तडवी सर्व पालकांचे शिक्षकांचे व विद्यार्थ्यांचे आभार शिवाजी सत्रे यांनी मानले.



# महाकाली यात्रानुषंगाने जिल्हाधिकाऱ्यांकडून मंदिराची पाहणी

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्ह्याची आराध्य दैवत म्हणून ओळख असलेल्या माता महाकाली यात्रेला 14 एप्रिलपासून सुरवात होणार आहे. यासंदर्भात करण्यात आलेल्या उपाययोजना बाबत जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी मंदिर परिसराची पाहणी करून सूचना दिल्या. यावेळी पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन, मनपा आयुक्त विपीन पालीवाल, उपविभागीय अधिकारी संजय पवार, तहसीलदार विजय पवार, मनपा उपायुक्त चंदन पाटील, वाहतूक निरीक्षक प्रवीणकुमार पाटील, परिवहन महामंडळाच्या विभागीय नियंत्रक स्मीता सुतावणे, मंदिराचे विश्वस्त सुनील महाकाळे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी गौडा म्हणाले, मंदिर परिसराची स्वच्छता नियमित होणे आवश्यक आहे. उन्हाळा असल्यामुळे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी. तसेच गर्दी टाळण्यासाठी भाविकांचा प्रवेश आणि बाहेर जाण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था असावी. 19 एप्रिल रोजी लोकसभा निवडणुकीचे मतदान असल्यामुळे या परिसरात असलेल्या दोन मतदान केंद्राच्या परिसरात दि. 18 एप्रिलच्या दुपारपासून तर 19 एप्रिल रोजी मतदान संपेपर्यंत 100 मीटर परिसरात येण्यास बंदी राहणार आहे. याबाबत मंदिर व्यवस्थापनाने भाविकांना सूचना द्याव्यात. तसेच महानगर पालिकेने झरपट नदी व परिसराची स्वच्छता नियमित करावी, अशा सूचना जिल्हाधिका-यांनी दिल्या. यावेळी जिल्हाधिकारी गौडा, पोलिस अधिक्षक सुदर्शन व इतर अधिकाऱ्यांनी माता महाकालीचे दर्शन घेतले.



# शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी आपण खासदारकीची उमेदवारी करणार : पोटे

आधुनिक केसरी न्यूज



**शिर्डी :** लोकसभा मतदारसंघातून प्रहार जिल्हाध्यक्ष अभिजीत पोटे यांनी शेतकरी संघटना पुरस्कृत अपक्ष उमेदवारी शेतकरी प्रश्नांसाठी करणार आहे शेतकरी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष ज्येष्ठ विधीतज्ञ अजित काळे यांच्या नेतृत्वात राज्यातील शेतकऱ्यांची कर्जमाफी वीज बिल माफी पाणी प्रश्न न्याय मिळवून दिला आहे जिल्हा शेतकरी संघटना व प्रहार जनशक्ती पक्ष नगर आम्ही एकत्रित रित्या शेतकरी प्रश्नावर काम करत आलो आहो यासाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते बच्चुभाऊ कडू व शेतकरी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष अजित काळे यांचे मार्गदर्शन व नेतृत्व लाभले आहे मी शेतकरी संघटना पुरस्कृत शिर्डी लोकसभा मतदार संघाची उमेदवारी करत आहोत. . शिर्डी लोकसभेसाठी पक्षाकडे अथवा संघटनेकडे उमेदवारीसाठी मागणी केलेली न मिळाल्यास अपक्ष लढविण्याची तयारी. आहे परंतु आम्ही ज्या प्रहार जनशक्ती पक्षामध्ये कार्यरत आहोत त्या पक्षाचे संस्थापक नेहमी सांगत असतात झेंडा महत्त्वाचा नसून अजेंडा महत्त्वाचा आहे ऊस वाहतुकीचा प्रश्न ऊसतोड मजुराचे प्रश्न शिक्षणाचा प्रश्न महागाई दिव्यांग बांधव यांच्या अडचणी आरोग्याचे प्रश्न विज प्रश्न. यासाठी. प्रहारच्या माध्यमातून संघर्ष केला आहे त्यामुळे शिर्डी लोकसभा मतदारसंघातील विकासाचा अनुशेष भरण्यासाठी आपण निवडणूक लढवणार असुन. जनतेची साथ असल्याने आपण विजयी होणार यात शंका नाही असे पोटे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली शेतकरी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष विधीज्ञ अजित काळे, प्रहार चे जिल्हाध्यक्ष अभिजीत पोटे, शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अनिल औताडे, शेतकरी संघटनेचे रूपेंद्र काले, . पांडुरंग औताडे, कृष्णा सातपुते, माऊली सांगळे, बाळासाहेब खर्जुले , संजय वाघ, हरी तुवर, महादेव आव्हाड, आप्पासाहेब ढूस, लक्ष्मण खडके विजय काकडे, जालिंदर आरगडे, रघुनाथ शिंदे, दीपक पटारे रमेश भालके नानासाहेब तागड भैरवनाथ कांगुणे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# टिल्लू पंपधारकांवर होणार जप्तीची कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** महानगरपालिकेमार्फत शहरातील सर्व नळ जोडणीवर जलमापक ( मीटर ) लावण्यात आले असुन १ जानेवारी पासुन याचा प्रत्यक्ष वापर सुरु झाला आहे. मात्र काही जागी मीटरला लावलेला पाईप काढुन पाणी भरत असल्याचे तसेच काही नागरिक टिल्लू पंपचा वापर करत असल्याचे आढळुन आल्याने त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करून जप्ती करण्याचा इशारा मनपातर्फे देण्यात येत आहे.

सर्व नळ जोडणींवर मीटर लावण्यात आले असल्याने पाण्याचा जेवढा वापर होईल तेवढेच देयक येत असुन अनावश्यक खर्च व अनावश्यक पाण्याच्या वापरावर नियंत्रण आले आहे. मात्र काही नागरिक नळाचे देयक कमी करण्याच्या दृष्टीने मीटरला लागून असलेला पाईप काढतात ज्यामुळे पाण्याचा वापर करतांना मीटर बंद असते व बिल अतिशय कमी येते,मात्र मीटर बंद झाले असता कळुन येत असल्याने अश्या नागरिकांना सूचना देण्यात येत असुन पुन्हा गैरप्रकार आढळल्यास त्यांच्यावर दंडात्मक कारवाई अथवा त्यांची नळ जोडणी बंद करण्यात येणार आहे.

त्याचप्रमाणे उन्हाळ्यातील पाणीटंचाई तसेच कमी दाबाने होणारा पाणीपुरवठा लक्षात घेता मनपातर्फे टिल्लू पंप लावणाऱ्यांविरुद्ध कारवाई सुरू करण्यात आली असुन नळाला विद्युत पंप अथवा टिल्लू पंप लावला असल्याचे आढळल्यास जप्तीची कारवाई केली जाणार आहे. उन्हाळा सुरु असल्याने पाण्याचा योग्य व पुरेसा वापर करण्याचे तसेच पाणी पुरवठाबाबत काही तक्रार असल्यास ९११२२१६०९५ या क्रमांकावर तक्रार करण्याचे आवाहन चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे.

# आनंदराज आंबेडकर यांचा निवडणूक लढणार

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** उमेदवारी अर्ज भरून माघारीची घोषणा केल्यानंतर नवीन घटनाक्रमात रिपब्लिकन सेनेचे अध्यक्ष आनंदराज आंबेडकर यांनी अखेर अमरावती लोकसभा मतदार संघातून निवडणूक लढण्याचा निर्णय घेतला आहे. पत्रकार परिषदेत आनंदराज आंबेडकर यांनी निवडणूक लढण्याची घोषणा केली. वंचित बहुजन आघाडी, एमआयएम आणि इतर मित्र पक्षांचा आपल्याला पाठिंबा असल्याचा दावा त्यांनी केला. आनंदराज आंबेडकर यांनी गेल्या २ एप्रिल रोजी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. वंचितने त्यांना पाठिंबा जाहीर करण्यास उशीर केलयाने त्यांनी निवडणुकीतून माघार घेण्याची घोषणा केली होती. ४ एप्रिलला वंचितने उमेदवार रिंगणात न उतरविण्याचा निर्णय घेऊन आनंदराज यांना पाठिंबा जाहीर केला.



# निवडणूक निरीक्षकांचा महाराष्ट्र - तेलंगणा सीमेवरील नागरिकांसोबत संवाद

## मतदान केंद्राला भेट व पाहणी

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** लोकसभा मतदार संघाची निवडणूक पहिल्या टप्प्यात म्हणजे 19 एप्रिल 2024 रोजी होणार असून यासाठी जिल्हा प्रशासनाने तयारी केली आहे. या तयारीची पाहणी करण्याकरिता सामान्य निवडणूक निरीक्षक लोकेशकुमार जाटव यांनी जीवती तालुक्यातील महाराष्ट्र आणि तेलंगणा राज्याच्या सीमेवर असलेल्या मतदान केंद्राला यांनी भेट दिली. तसेच येथे कार्यरत कर्मचारी आणि नागरिकांशी संवाद साधला.

महाराष्ट्र – तेलंगणा सीमेवरील अंतापूर, पद्मावती, इंदिरानगर, पळसगुडा, येसापूर, भेलापठार, लेंडीगुडा, येसापूर (नारायणगुडा), शंकरलोधी, महाराजगुडा, कोठा (बु.), परमडोली, मुकदमगुडा आणि लेंडीजाळा या 14 गावांसाठी एकूण सहा मतदान केंद्र राहणार आहेत. यातील पुडीयालमोहदा आणि परमडोली या मतदान केंद्राला निवडणूक निरीक्षक श्री. जाटव यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी, पोलिस पाटील व स्थानिक नागरिकांशी संवाद साधला.

निवडणूक संदर्भात काही अडचण आहे का, दोन्ही राज्यासाठी मतदान करता का, मतदार माहिती चिठ्ठी मिळाल्या का, याबाबत त्यांनी नागरिकांना विचारणा केली. यावेळी जीवतीचे तहसीलदार अविनाश शेंबटवाड, नायब तहसीलदार श्री. वाहने, तलाठी मेटलवार आणि मतदान केंद्रस्तरीय अधिकारी उपस्थित होते.

**मतदान केंद्रनिहाय मतदार संख्या :** महाराष्ट्र – तेलंगणा सीमेवरील 14 गावांसाठी असलेल्या सहा मतदान केंद्रातंर्गत 2694 पुरुष मतदार तर 2423 स्त्री मतदार असे एकूण 5117 मतदार आहेत. यात पुडीयालमोहदा मतदान केंद्रातंर्गत एकूण 722 मतदार (पुरुष – 374, स्त्री - 348), कुंभेझरी मतदान केंद्रातंर्गत एकूण 1435 मतदार (पुरुष – 755, स्त्री - 680), भोलापठार मतदान केंद्रातंर्गत एकूण 831 मतदार (पुरुष – 436, स्त्री - 395), वणी (खु.) मतदान केंद्रातंर्गत एकूण 612 मतदार (पुरुष – 324, स्त्री - 288), महाराजगुडा मतदान केंद्रातंर्गत एकूण 301 मतदार (पुरुष – 152, स्त्री - 149) आणि परमडोली मतदान केंद्रातंर्गत एकूण 1216 मतदार (पुरुष – 653, स्त्री - 563) आहेत.

शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

# तलवाड्यात हिंदू -मुस्लिम एकतेचा शीरखुरमा !

## तलवाडा येथे ईद उत्साहात साजरी गुलाबपुष्प देऊन शुभेच्छा!

आधुनिक केसरी न्यूज

**शांताराम मगर**

**वैजापूर :** मराठवाड्याचे प्रवेशद्वार समजल्या जाणाऱ्या तलवाडा येथील मुस्लिम बांधवांच्या वतीने मुस्लिम समाजाचा पवित्र रमजान महिन्याचे औचित्य साधून गुरुवारी तलवाडा येथील मुस्लिम बांधवाचा पवित्र सण म्हणून ओळखल्या जाणाऱ्यारमजानईदहा सण मोठ्या ऊत्साहात साजरा करण्यात आला. तलवाडा येथे विविध धर्मीयांचे सणऊत्सव सर्वधर्मीय सहभागी होवून मोठ्या ऊत्साहात साजरे करण्यात येतात त्याचप्रमाने यंदाहीरमजानईदहा मुस्लिम धर्मीयांचा पविञरमजान ईद हा सण ऊत्साहात साजरा करण्यात आला.मुस्लिम बांधवांनी सकाळी नमाज अदा करुन एकमेकांना ईदनिमित्त शुभेच्छा दिल्या.ईतर धर्मीयांनीही मुस्लीम बांधवांना शुभेच्छा देवुन एकतेचे दर्शन घडविले.हिंदू बांधवानीरमजानइदनिमित्त मुस्लीम बांधवांची सदिच्छा गळा भेट घेत गुलाब पुष्प देत शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रतिष्ठितनागरिक, पत्रकार, राजकीय, सामाजिक, धार्मिक क्षेत्रातील मान्यवरांनी हजेरी लावल्याने सामाजीक एकात्मतेचे दर्शन तलवाडा वासीयांत दिसून आले. मुस्लिम समाजात पवित्र महिना म्हणून रमजान महिन्यात विविध धार्मीक कार्यक्रम करत दिवसभर रोजा (उपवास) करत रमजान ईद मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. याचेच औचित्य साधून तलवाडा येथे शिरखुर्मापार्टीचे आयोजन करण्यात आले याशिरखुर्मापार्टीला परीसरातील पत्रकार राजकीय, सामाजीक, धार्मिक विविध क्षेत्रातील मान्यवारांनी हजेरी लावत सामाजीक एकात्मतेचे आगळे वेगळे दर्शन घडले यावेळीहिंदू आणि बौद्ध बांधवानी मुस्लिम बांधवाना गळा भेट घेऊन मुस्लिम बांधवांना शुभेच्छा देण्यात आल्या यावेळेस हिंदू बैध्द मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली. अत्यंत उत्साहात हिंदू-मुस्लीम बांधवांनी या निमित्ताने पवित्र रमजानच्या शुभेच्छांची देवाण-घेवाण करण्यासाठी कु.ऊ.बा. मा.सभापती भागीनाथ मगर पंचायत समिती उपसभापती राजेन्द्र मगर, भाऊसाहेब मगर, विनोद मगर, जनार्दन मगर, शामराव मगर, रवी मगर, द्तु मगर, शांताराम मगर, वसंत मगर, राजेंद्र पवार, दादाभाऊ मगर यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य विविध कार्यकारी सोसायटीचे सदस्य पदाधिकारी विविध पक्षाचे कार्यकर्ते, पदाधिकारी, विविध संस्थांचे प्रमुख, व्यापारी, पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते यांच्यासह मोठ्या संख्येने हिंदू-मुस्लीम बांधव उपस्थित होते.



# शिवसेना (उबाठा) ग्रामीण सहसंघटकपदी धुराजी नावंदे, तालुका संघटकपदी शेषेराव दिघे

आधुनिक केसरी न्यूज





**लोहा :** शिवसेना (उबाठा) पक्षाचा विस्तार करण्यासाठी तसेच पक्षाचे ध्येय धोरण, पक्षाचे नवीन चिन्ह हे तळागाळातील व ग्रामीण भागातील कार्यकर्त्या पर्यंत पोहचविण्यासाठी शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशाने नुकत्याच रिक्त व नूतन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या. त्यामध्ये शिवसेना (उबाठा) नांदेड जिल्हा दक्षिण सहसंघटक पदी धुराजी नांदेड तर तालुका संघटक पदि शेषेराव दिघे यांची नियुक्ती करण्यात आली.

धुराजी नावंदे व शेषेराव दिघे यांच्या नियुक्ती बद्दल सेनेचे नांदेड जिल्हा संपर्कप्रमुख बबनराव थोरात, लातूर जिल्हा संपर्कप्रमुख माजी आ. रोहिदास चव्हाण, विधानसभा संपर्क प्रमुख दिपक शेंडे, नांदेडचे उपजिल्हा संपर्कप्रमुख भुजंग पाटील डक, जिल्हा प्रमुख बंडू खेडकर, उपजिल्हा प्रमुख बाबुराव मोरे, तालुकाप्रमुख पद्माकर सावंत सह आजी-माजी पदाधिकारी व शिवसैनिकांकडून आनंद व्यक्त करण्यात येत आहे.



# पतंजली योग परिवार नांदेडतर्फे गुढीपाडवा उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** चैत्र मास शुक्ल प्रतिपदेला गुढीपाडवा हा उगादी म्हणून साजरी केला जातो. या दिवशी हिंदू नववर्ष प्रारंभ होतो, भारतात हिंदू नववर्ष गुढीपाडवा सर्वत्र साजरीकरण केल्या जातो. या दिवशी भगवान विष्णू व ब्रह्माजींची पूजा केली जाते. गुढीचा अर्थ आहे विजय पताका व पाडवा चा अर्थ चंद्रमा चा पहिला दिवस. असे म्हटले जाते की भगवान ब्रह्मा ने ब्रम्हांडाची निर्मिती याच दिवशी केली, तसेच भगवान श्रीरामाने बळीचा वध करून सुग्रीव व प्रजेला कुशासनमुक्त केले.

पतंजली योग परिवार नांदेडतर्फे यावर्षी गुढीपाडवा भक्ती लॉन्स मंगल कार्यालयाच्या भव्य पटांगणावरती मालेगाव रोड ठिकाणी साजरी करण्यात आला. मंगळवार दिनांक 9 एप्रिल रोजी सकाळी पाच ते सात योग वर्ग झाला त्यानंतर नववर्ष साजरीकरण करण्यात आले. पुरुष तसेच माता-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. थायलंड ठिकाणी योगासन स्पर्धेत आदरणीय किशन भवर यांना सुवर्णपदक तर सोपानराव काळे यांना रोप्य पदक मिळाल्याबद्दल त्यांच्या सन्मान करण्यात आला, तसेच आदरणीय श्री बक्षीसिंग पतंजलीचे जालंदर तहसील प्रभारी यांनी विविध पद्धतीने हाश्यासन करत सर्वांना मंत्रमुग्ध केले. सिताराम सोनटक्के यांनी योग सत्र संचलन केले. सर्वांनी मोठ्या उत्साहात पणह शरबत प्रसाद म्हणून ग्रहण केला व गुढीपाडवा साजरी केला. सर्वश्री सिताराम सोनटक्के, हनुमंत ढगे, महारुद्र माळगे, अनिल कामिनवर, शिवाजी शिंदे हळदेकर, माधव शिंदे, हरिहर, पंडित पाटील, बालाजी शिंदे, संजय सोनटक्के, सायना लिंगणा, उत्तम अकुटवार, बालाजी मोरे, रतन कल्याणकर, शिवाजी नाईकवाडे, अवधूत गिरी, प्रदीप संगणवार, किरण मुत्तेपवार, आत्माराम पांचाळ, दिगंबर कल्याणी, रवींद्र जिल्हावार, मंगेश महाजन, पंकज आईनेले, रंजीत हटकर, माधव देवडे, हरिहरजी नरवाडे, भारत चाकोते, रंजीत कवठेकर, दादाराव आगलावे, चैतन्य आगलावे, किशन फालके, किशोर पसलवाड, बी एन मुंडे, पी. एस. निखाते, राठोड अनिल, विजय भोयर, वेदांत भोयर, पार्थ पोळ, नागोराव सूर्यवंशी, सूर्यकांत पाटील, फुकेजी, सदाशिव पाटील बुटले, माधवराव गंगासागरे, राजू लोखंडे, दिलीप माने, शरद अडसुळ, मोहन गुरमे, भगवान कमारिकर, पार्थ मुतेपवार, विलास वरपडे, सतीश कुबडे, भारत मोरे, विनोद पाटील, मकरंद पांगरकर, विक्रम कोटगीरे, आशिष पाम्पटवार, माधव काकडे, कदम पवनकुमार, विलास कवठेकर, अशोक नातेवाड, मुंजाजी भोकरकर, लता चिंचोलीकर, श्रुती कदम, सोनू पवार, जयश्री बिरादार, जया मुत्तेपवार, जयश्री कल्याणकर, योगानंद जमशेट्टे, नम्रता जमशेट्टे, गोदावरी दुर्ग, स्वाती नरवाडे, हरिहर नरवाडे, बाळू भोकरकर, शिवाजी शिंदे, दर्शन मुत्तेपवार, रंजना सोनटक्के, जयश्री गंदेवार, चंदा हळदे पाटील, स्नेहा मोहोकार, सरोजिनी संगेवार, कल्पना मोरे, उज्वला कल्याणी, मिनाबाई जाधव, वैभवशाला जिल्हावार, शीतल नाईकवाडे, गोदावरी मोरे, प्रतिभा फडके, कीर्ती नीलमवार, अस्मिता सूर्यवंशी, मनीषा सूर्यवंशी, मनीषा शिंदे, वैष्णवी अक्कमवाड, शारदादेवी राठोड, सविता चव्हाण, मीना कदम, क्षमा वाघमारे, पंचशीला वाघमारे, सविता दरक, प्रभावती पाटील, सिंधू माने, सुरेखा पवार, सुनिता भिंगे, शालिनी शिंदे, सिंधु कल्याणकर, प्रतिभा राठोड, विमल बाभळीकर, रेणुका राठोड, लक्ष्मी पवार,चंद्रकला भांडेकर, अंजली ढोरे, मनीषा शिंदे, महानंदा माळगे, अशोक वैजवाडे, सुनीता वजवाडे, उर्मिला साजने, दिगंबर पाटील, बक्षीसिंग जालंदरवाले, बलवंतसिंग संधू , भीमराव कारामुंगे, मकरंद पांगरकर आदी मान्यवर उपस्थित होते असे अनिल अमृतवार यांनी सांगितले.



# आता राष्ट्रवादीतही धुलाई मशीनचे आगमन ?

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** संपूर्ण देशात लोकसभेच्या निवडणुकीच्या उमेदवारीची उलटसुलट चर्चा सुरु असताना भाजप कोल्हे गटाला मात्र कोपरगाव शहरात मोठा धक्का बसला असून कोल्हे गटाच्या माजी उपनगराध्यक्षांसह नगरसेवक व कार्यकर्त्यांनी नुकताच आ.आशुतोष काळे यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी कॉंग्रेस (काळे गट)मध्ये जाहीर प्रवेश केला आहे. त्यामुळे आता भाजप पाठोपाठ आता राष्ट्रवादी अजित पवार गटातही भाजप छाप धुलाई मशीन उपलब्ध झाले का ? असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. त्याबाबत कोपरगाव शहरात उलटसुलट चर्चेला उधाण आले आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या काही महिन्यांपासून अनेक अनपेक्षित पक्षांतरं झाल्याचं पाहायला मिळालं आहे. अशोक चव्हाण यांच्या पक्षांतरावेळी यासंदर्भात मोठी चर्चा झाली असून आता पुन्हा एकदा एक चर्चेतलं पक्षांतर राज्याच्या राजकारणात केंद्रस्थानी आलं आहे.माजी मंत्री एकनाथ खडसे पुन्हा स्वगृही अर्थात भारतीय जनता पक्षात जाणार असल्याच्या चर्चेला सध्या उधाण आलं आहे.मुळात अजूनतरी या पक्षांतराची फक्त चर्चाच असताना त्यावरून राजकीय तर्क-वितर्क सुरू झाले आहेत. मात्र कोपरगाव तालुक्यात मात्र वेगळा पॅटर्न सुरु असल्याचे दिसत असून कोपरगाव नगरपरिषदेच्या निवडणुकीचा कुठलाही मागमूस नसताना येथे पक्षांतर घडू लागले असल्याचे दिसून येत आहे.यात प्रमुख नाव माजी उपनगराध्यक्ष स्वप्नील निखाडे यांचे नाव आघाडीवर आहे.त्यांनी माजी खा.स्व.शंकरराव काळे यांच्या जयंतीच्या मुहूर्तावर हा विशेष शुद्धीकरण विधी उरकला आहे.त्यात माजी नगरसेवक बाळासाहेब आढाव,तसेच उल्हास पवार,सुरेश पवार,ओम आढाव,ऋषिकेश आढाव,नवनाथ बढे या कार्यकर्त्यांचा समावेश आहे.त्यामुळे आता भाजप पाठोपाठ राष्ट्रवादीत भाजप च्या कार्यकर्त्यांना घेऊन शुद्धीकरण होताना उलट प्रवाह प्रवाहित होताना दिसत आहे. ज्या माजी उपनगराध्यक्षांनी राष्ट्रवादी अजित पवार गटात प्रवेश केला आहे त्यांचा गत आठ वर्षात तरुण असूनही लौकिक फार चांगला असल्याचे दिसून आलेले नाही.भाजपचे निष्ठावान माजी नगराध्यक्ष विजय वहाडणे यांच्या काळात माजी खा.भाऊसाहेब वाकचौरे यांनी केंद्रातून पाणी योजनेसाठी जो ४२ कोटींचा निधी आणला होता.त्याचे बिल काढण्यासाठी परळीस्थित ठेकेदार यांचेकडून २५ लाख रुपयांची बिदागी मिळाली असल्याचा भर सभागृहात आरोप झाला होता.त्यानंतर त्यांचेवर वरीष्ठ नाराज असल्याची माहिती होती त्यांच्यात कधीच परत सूत जुळले नसल्याची माहिती आहे.त्यामुळे आता भाजपचा हा खास,' वाण नाही पण;गुण आता राष्ट्रवादीस लागला असल्याची जोरदार चर्चा शहरात रंगली आहे. सदरप्रसंगी माजी नगराध्यक्ष पद्माकांत कुदळे,महात्मा गांधी जिल्हा चरिटेबल ट्रस्टचे सचिव धरमचंद बागरेचा, जिल्हा युवक अध्यक्ष कृष्णा आढाव,अशोक आव्हाटे आदी मान्यवरांसह राष्ट्रवादीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पाणंद रस्ते योजना कामांना मुहूर्त मिळेना

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील मनरेगा अंतर्गत पालकमंत्री शेत पाणंद रस्ते कामांना मुहूर्तच मिळत नसल्याने मंजुर कामे निधी पडून असुण प्रशासनाकडून निव्वळ चालढकल सुरु असल्याचे चित्र आहे.यंत्रणा मनरेगा चे काम करण्या नीर्उत्सुक का आहे याचे प्रश्न नागरिक शेतकऱ्यांना पडला आहे.वरिष्ठाधिकाऱ्यांनी याकडे लक्ष घालून पाणंद रस्ते काम मार्गी लावावे असी मागणी जोर धरत आहे. महाराष्ट्र शासनाच्या अभिनव योजना मी समृद्ध तर गाव समृद्ध आणि गाव समृद्ध तर माझा महाराष्ट्र समृद्ध ही संकल्पना मनरेगा कामांना खुलताबाद तालुक्यात मुहूर्त मिळत नसल्याने गत दिडदोन वर्षांपासून कामे रखडून असुण निधी उपलब्ध असताना चालढकल मुळे कामे रखडून असल्याचे चित्र आहे.पालकमंत्री शेत पाणंद रस्ते योजना राबविण्याचा शासन निर्णय सन२०१८केलेले आहे.यामधे रस्त्यांची वर्गवारी आहे त्यात एका गावाहून दुसऱ्या गावाला जाणारे रस्ते,शेतावर जाण्याचा गाडी मार्ग या प्रकारच्या वर्गवारी मोडणारे बाजार सावंगी ते शिरोडी बु रस्ता हा गाडी मार्ग व सावंगी ते सोनवणे वस्ती आदि व अन्य तालुक्यातील रस्ते या योजनेत मंजूर असताना व निधी उपलब्ध असताना तथा तालुका पंचायत समिती आम सभेत गाजलेला हा प्रश्न मार्गी लागत नाही.

# नेवासा येथे रमजान ईद सण उत्साहात साजरी

## आमदार गडाख यांनी उपस्थित राहून दिल्या शुभेच्छा

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** शहरासह तालुक्यात रमजान ईदचा सण उत्साहात साजरा करण्यात आला.नेवासा तालुक्याचे आमदार शंकरराव गडाख यांनी नेवासा येथे स्वःत उपस्थित राहून मुस्लिम समाज बांधवांना रमजान ईद सणाच्या शुभेच्छा दिल्या.हिंदू मुस्लिम समाज बांधवांच्या शुभेच्छापर गळाभेटीने राष्ट्रीय ऐक्याचे दर्शन घडले.

रमजान ईद सणाच्या निमित्ताने खुपटी रोडवर असलेल्या ईदगाह मैदानावर ईद निमित्ताने सामुदायिक नमाज कार्यक्रमाचे आयोजन मौलवींच्या उपस्थितीत करण्यात आले होते. यावेळी खुदबा,बयाण,दुवा करून अल्लाहताला कडे प्रार्थना करण्यात आली. येथील कार्यक्रमानंतर हिंदू मुस्लिम बांधवांनी एकमेकांना आलिंगन देत ईद सणाच्या निमित्ताने शुभेच्छा दिल्या. ईद सणाच्या निमित्ताने नेवासा शहरात सकाळी ८ वाजता येथील नूराणी मस्जिदमध्ये मौलानांच्या उपस्थितीत नमाज अदा करण्यात आली.ईदगाह मैदानावर सकाळी नऊ वाजता मुप्ती अब्दुल रहीम यांनी झालेल्या सामूहिक नमाज कार्यक्रम प्रसंगी खुदबा,बयान दुवा अदा करण्यात आली.नेवासा तालुक्यात ही ठीकठिकाणी सामुदायिक नमाजचे आयोजन करण्यात आले होते.

नेवासा येथील संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर रोडवर असलेल्या संत तुकाराम महाराज मंदिर चौकात नेवासा तालुक्याचे आमदार शंकरराव गडाख यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या समवेत हजेरी लावून गळाभेट घेत मुस्लिम समाज बांधवांना ईद सणाच्या शुभेच्छा दिल्या. रमजान ईदच्या निमित्ताने घरोघरी शिरखुर्मा व गुलगुले पार्टीचे आयोजन मुस्लिम समाज बांधवांच्या वतीने करण्यात आले होते.

रमजान ईद सणाच्या निमित्ताने सर्वधर्मीय व सर्वपक्षीय नागरिकांनी गळाभेट घेऊन मुस्लिम समाज बांधवांना ईद सणाच्या शुभेच्छा देऊन राष्ट्रीय ऐक्याचे दर्शन घडवले. नेवासा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक धनंजय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस बांधवांनी देखील पोलीस दलाच्या वतीने मुस्लिम समाज बांधवांना गुलाबपुष्प देऊन ईदच्या शुभेच्छा दिल्या.

नेवासा येथे झालेल्या शुभेच्छा कार्यक्रम प्रसंगी आमदार शंकरराव गडाख यांच्या समवेत संत ज्ञानेश्वर महाराज मंदिराचे विश्वस्त रामभाऊ जगताप,नेवासा बाजार समितीचे सभापती नंदकुमार पाटील,मुळाचे चेअरमन नानासाहेब



तुवर,प्रहार जिल्हाध्यक्ष अभिजित दादा पोटे,माजी नगराध्यक्ष सतीश पिंपळे,लक्ष्मणराव जगताप,संजय सुखदान,राजेंद्र मापारी,घुले पाटील पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन महंमदभाई शेख टेलर,माजी जिल्हा परिषद सदस्य महंमदभाई आतार,अँड. एम आय पठाण,जनाब राजमहंमद शेख,फारूक आतार,मोहंमद इलियास आतार, सोसायटीचे माजी चेअरमन दिलीपराव जामदार,हारुण जहागिरदार, सामाजिक कार्यकर्ते प्रा.वाय.बी.शेख सर,राजेंद्र मापारी, पप्पू कडू,नारायण लोखंडे,इम्रानभाई दारूवाले,जितेंद्र कु-हे,फारूकभाई कुरेशी,राजेंद्र चौधरी आदींच्या उपस्थितीत शुभेच्छा कार्यक्रम घेण्यात आला. ईदच्या निमित्ताने झालेल्या सामुदायिक नमाज प्रसंगी हजारोंच्या संख्येने मुस्लिम समाज बांधव उपस्थित होते

नेवासा येथील श्रीरामपूर रोडवरील खोलेश्वर गणपती चौक,नगरपंचायत चौक,संत तुकाराम महाराज मंदिर चौक, लोखंडे गल्लीतील कामीनपीर,डॉ.घुले हॉस्पिटल येथील चौकात चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. ईद शांततेत व उत्साहपूर्ण वातावरणात साजरी झाली.



# पो. नि. रोहीदास माळी यांनी गहाळ झालेले पैसे, सोन्याचे दागिने केले परत

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** येथील साई संगम प्रतिष्ठानचे अध्यक्ष संदीप सोनवणे उद्योजक संजय गव्हाणे यांच्या उपस्थितीत नुकताच साईबाबा संस्थानचे मंदिर सुरक्षा अधिकारी पोलिस निरीक्षक रोहीदास माळी यांनी साईभक्त भाविकांची चोरी व गहाळ झालेले पैसे व सोन्याचे दागिने मुद्देमाल परत साईभक्त भाविकांना परत देण्यासाठी जे दोन महिन्यांत धाडसी कारवाई ९५० सुरक्षा रक्षक व दोन साध्या वेषातील पथकाच्या माध्यमातून करत साईबाबा संस्थानचा नावलौकिक वाढवण्यासाठी केलेला प्रयत्न कौतुकास्पद असल्याचे. मत शाल व गुलाबपुष्प देऊन सत्कार कार्यक्रमा प्रसगी बोलताना अध्यक्ष संदीप सोनवणे यांनी आपले मत व्यक्त केले. या प्रसंगी बोलताना संजय गव्हाणे म्हणाले की जर पोलीस व मंदिर सुरक्षा कर्मचारी यांनी जर संकल्प केला तर चोरी होऊ शकत नाही व झाली तरी चोराला पकडल्या शिवाय पोलीस राहत नाही हेच पोलीस उपनिरीक्षक रोहीदास माळी यांनी आपल्या कामातून दाखवून दिले आहे असे सांगितले.

यावेळी पोलीस उपनिरीक्षक रोहीदास माळी म्हणाले कि सर्व सुरक्षा रक्षकांनी एकजुटीने चांगली सेवा देण्यासाठी केलेला संकल्प व टिमवर्क यामुळे त्रिसदस्यीय समितीच्या मार्गदर्शनाखाली साईभक्त भाविकांना चांगली सुरक्षा देण्यासाठी वचन बध्द असल्याचे सांगितले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते सचिन तुरकणे रविंद्र तुरकणे गणपत भागवत नवनाथ शेळके प्रदिप पठारे योगेश रसाळ विलास गायकवाड उपस्थित होते.

# संपदा पतसंस्था घोटाळ्यात 'वाफारे' दाम्पत्यासह ५ जणांना जन्मठेप, इतरांना 'ही' शिक्षा

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** संपदा नागरी सहकारी पतसंस्थेत झालेल्या १३ कोटी रुपयांच्या आर्थिक घोटाळ्याप्रकरणी दोषी ठरवून तत्कालीन अध्यक्ष तथा घोटाळ्याचा मुख्य सूत्रधार ज्ञानदेव वाफारे याच्यासह तिघा जणांना जिल्हा सत्र न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. ज्ञानदेव वाफारे, त्याची पत्नी सुजाता वाफारे व एका संचालकाला जिल्हा व सत्र न्यायाधीश आर. एन. नाईकवाडी यांनी बुधवारी जन्मठेपेची शिक्षा सुनावली. तर इतर बारा जणांना वेगवेगळ्या कलमाखाली ५ ते १० वर्षांची शिक्षा सुनावली आहे. संपदा नागरी सहकारी पतसंस्थेत सन २००९-१० मध्ये झालेल्या आर्थिक घोटाळ्याप्रकरणी न्यायालयाने शनिवारी वाफारे याच्यासह इतरांना दोषी ठरवले होते. त्याचवेळी १७ जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले होते. या १७ आरोपींना बुधवारी जिल्हा व सत्र न्यायालयात हजर करण्यात आले होते. बुधवारी सकाळी न्यायालयाने अंतिम निर्णय दिला आहे. अध्यक्ष ज्ञानदेव वाफारे व त्याची पत्नी सुजाता वाफारे साहेबराव भालेकर, संजय बोरा, रवींद्र शिंदे अशा ५ जणांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. सरकारी पक्षाच्या वतीने अनिल ढगे यांनी बाजू मांडली. ठेवीदारांच्या वतीने ऍड. अनिता दिघे यांनी व अवसायक मंडळाच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ सुरेश लगड यांनी बाजू मांडली. दरम्यान, या खटल्याचा निकाल लागला असला तरी अद्याप ठेवीदारांना त्यांचे पैसे परत मिळण्याचा मार्ग मात्र अद्याप सुकर झालेला नाही. हे आहेत इतर आरोपी - सुधाकर परशुराम थोरात, भाउसाहेब कुशाबा झावरे, उत्तमराव दगडू चेमटे, दिनकर बाबाजी ठुबे, विष्णूपंत गणपत व्यवहारे, राजे हसन अमीर, बबन देवराम झावरे, लहू सयाजी घंघाळे, हरिश्चंद्र सावळेराम लोंढे, अनुष प्रविण पारेख, मारूती खंडू रोहोकले, चिमाजी खंडू रोहोकले, बबन खंडू रोहोकले, सुधाकर गोपीनाथ सुंबे, गोपीनाथ शंकर सुंबे, महेश बबन झावरे व संगिता हरिश्चंद्र लोंढे.




# कष्टाला पर्याय नाही : विवेक वेलवणकर

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण हे विद्यार्थ्यांना पुन्हा घेता येत नाही. या वर्गात शिक्षण घेण्याची संधी पुन्हा मिळत नाही.ही मुले प्रामाणिकपणे अभ्यास करत असतात.त्यांनी टेन्शन घेणे बंद केले पाहिजे.शिक्षणाचा पुढील प्रवास करताना स्वतः मधील कौशल्ये विकसित केल्यास देशात व परदेशातही मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध आहे.त्यामुळे कौशल्ये विकसित करून उज्वल भविष्यासाठी कष्टाला पर्याय नसून प्रामाणिकपणे कष्ट करणे गरजेचे आहे असे प्रतिपादन प्रसिद्ध व्याख्याते विवेक वेलवणकर यांनी कोपरगाव येथे एका कार्यक्रमात बोलताना केले आहे.

समता नागरी सहकारी पतसंस्था यांचे सौजन्याने समता इंटरनॅशनल स्कूल व समता स्टडी पॉईंट यांच्या संयुक्त विद्यमाने माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणानंतरच्या संधी व करिअर विषयी स्व.यशवंतराव चव्हाण समता सहकार सभागृहात पुणे येथील शिक्षण व करिअर क्षेत्रातील मार्गदर्शक व प्रसिद्ध व्याख्याते विवेक वेलणकर यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान समता पतसंस्थेचे अध्यक्ष ओमप्रकाश कोयटे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आले होते. सदर प्रसंगी समता पतसंस्थेच्या उपाध्यक्षा श्वेता अजमेरे,समता स्टडी पॉईंट व्यवस्थापन समिती सदस्या सोनल लांडगे आदींसह कोपरगाव तालुक्यातील पालक व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. पुढे बोलताना ते म्हणाले की,"पालकांनी देखील शिक्षण क्षेत्रातील समज,गैरसमज लक्षात घेऊन आपल्या पाल्याला स्पर्धेच्या युगात गुणवत्तापूर्ण अभ्यास करून गुणवत्ता पूर्ण शिक्षण कसे मिळेल ? याकडे विशेष लक्ष दिले पाहिजे.वेगवेगळ्या कोर्सला जाण्यासाठी कोर्सची सीईटी द्यावी लागते.त्याबाबत पालकाला व आपल्या पाल्याला परिपूर्ण माहिती असणे आवश्यक असून त्यासाठी विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे.आवडीचे क्षेत्र निवडून प्रामाणिकपणे कष्ट करून अभ्यास केला तर; यश तुमचेच आहे. फक्त त्यासाठी पालक व पाल्यांचा सकारात्मक दृष्टीकोन,प्रबळ इच्छाशक्ती व मानसिकता असली पाहिजे.

समता इंटरनॅशनल स्कूलच्या वतीने कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना कुलदीप कोयटे म्हणाले की,"पूर्वी आर्ट, कॉमर्स,सायन्स या शाखांचीच विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती असल्याने विद्यार्थी शिक्षण घेत होते.स्पर्धेमुळे शिक्षणाच्या शेकडो वाटा खुल्या झाल्या आहेत.त्यामुळे विद्यार्थी संभ्रमावस्थेत होते.आता विवेक वेलवणकर यांचे हे मार्गदर्शनपर व्याख्यान विद्यार्थ्यांना महत्वाचे ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

व्याख्याते वेलवणकर यांचा सत्कार कार्यक्रमाचे अध्यक्ष कोयटे यांच्या हस्ते करण्यात आला.तर समता स्टडी पॉईंटचे व्यवस्थापन समितीचे सदस्य राजकुमार बंब यांनी आपले मनोगत व्यक्त केले आहे.

# कोपरगाव तालुकाहद्दीत शेतातील मोटरची चोरी

## चोरट्यांचा बंदोबस्त करणार की नाही

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** कोपरगाव तालुक्यातील करंजी ग्रामपंचायत हद्दीत गट क्रं.३३३ मधील क्षेत्रातून अज्ञात चोरट्याने आपल्या विहिरीतील पाणबुडी विद्युत पंप चोरून नेला असल्याची फिर्याद शेतकरी संदीप जगन्नाथ शहाणे ( वय-४२ ) यांनी दाखल केल्याने तालुक्यात खळबळ उडाली आहे.

कोपरगाव तालुक्यात या वर्षी मोठ्या प्रमाणावर दुष्काळाच्या झळा जाणवू लागल्या असून पाण्याचे दुर्भिक्ष जाणवत असताना चोरट्यांनी आपली हाथ की सफाई दाखविण्यास सुरुवात केली असल्याची उदाहरणे समोर येत आहे.

कोपरगाव तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत करंजी ग्रामपंचायत असून या ठिकाणी रहात असलेले शेतकरी संदीप शहाणे हे आपली शेती कसत आहे.

त्या शेतात त्यांची विहीर असून दि.०९ एप्रिल रोजी रात्री ०८ ते दि.१० एप्रिल दुपारी १.३० वाजेच्या सुमारास अज्ञात चोरट्याने चोरीच्या इराद्याने आपल्या शेतातील एक सुमारे ०६ हजार रुपये किमतीची पाणबुडी विद्युत मोटार चोरून नेली आहे.आजूबाजूस आपण शोध घेऊनही ती मिळून आली नाही.

दरम्यान या प्रकरणी त्यांनी कोपरगाव तालुका पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

घटनास्थळी पोलीस निरीक्षक संदीप कोळी यांच्यासह पोलीस हे.कॉ.निजाम शेख यांनी भेट दिली आहे.

दरम्यान या प्रकरणी त्यांनी कोपरगाव तालुका पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा क्रं.१३४/२०२४ भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.पुढील तपास पोलीस निरीक्षक कोळी यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस हे.कॉ.शेख हे करीत आहेत.

दरम्यान या प्रकरणी शेतकरी वर्गात भीतीचे वातवरण पसरले आहे.

कोपरगाव तालुक्यातील शेतकऱ्यांच्या ट्रॅक्टरच्या बॅटऱ्या, विद्युत मोटारी, दुचाकी मोटरसायकल, मोबाईल, विद्युत मोटार स्टार्टर, केबल चोरीच्या घटना मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. पोलिसांचा चोरट्यांवर धाक राहिलेला दिसत नाही. शेतकरी चहूबाजूंनी अडचणीत आला आहे पोलीस या चोरट्यांचा बंदोबस्त करणार की नाही असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.